एकजूट आमची न्यारी...
देशभक्ती आम्हास प्यारी..!!

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

प्रजासत्ताक दिन निमित्त सर्व देशवासीयांना हार्दिक शुभेच्छा

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १९९ ■ रविवार, दि. २५ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# नरनाळा महोत्सव की अकोलेकरांच्या तिजोरीवर दरोडा?

## स्थानिकांचा रोजगार शून्य, बाहेरील कंत्राटदारांचे खिसे गरम; मेळघाटाच्या जैवविविधतेचाही बळी !

प्रतिनिधी २५ जानेवारी



**अकोला:** ऐतिहासिक वारसा आणि पर्यटनाच्या नावाखाली अकोला जिल्हा प्रशासनाने आयोजित केलेला 'नरनाळा महोत्सव' सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. अकोलेकरांच्या हक्काच्या 'जिल्हा नियोजन समिती'च्या निधीचा विनियोग स्थानिक विकासासाठी करण्याऐवजी, तो अमरावती आणि चंद्रपूरच्या बाह्य एजन्सींच्या घशात घातला जात असल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. सुमारे काही कोटींच्या या उधळपट्टीतून साध्य काय ? हा प्रश्न आता सुज्ञ अकोलेकर विचारत आहेत. अकोल्याच्या अस्मितेचा वापर करून बाहेरील एजन्सींना पोसण्याचा हा प्रकार जिल्हा प्रशासनाच्या पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करतो.

### 'इव्हेंट मॅनेजमेंट'च्या नावाखाली कोट्यवधींची लूट

या महोत्सवाचा ढाचा पाहता, तो पर्यटनापेक्षा 'सेलिब्रिटी इव्हेंट' अधिक वाटत आहे. 'चला हवा येऊ द्या' सारख्या प्रसिद्ध टीम आणि नामवंत गायकांसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जात आहेत. हा पैसा अकोल्यातील स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी खर्च करता आला असता. स्थानिक विकास कामांच्या पायाभूत सुविधांसाठी वापरण्याऐवजी, दोन तासांच्या मनोरंजनावर उडवणे कितपत न्याय्य आहे अशी ही विचारणा होत आहे. महोत्सवाच्या नियोजनात स्थानिक कलाकार, पर्यावरणप्रेमी आणि गाईड्सना साधे निमंत्रणही नाही. अकोल्याच्या कलेला व्यासपीठ देण्याऐवजी बाहेरच्यांना रेड कार्पेट कशासाठी ? अशी जळीत टिका आता होत आहे.

### हॉटेल लॉबीचे हितसंबंध आणि प्रशासकीय मनमानी

लोकप्रतिनिधींनी एका शासकीय बैठकीत या महोत्सवावर गंभीर आक्षेप घेतले आहेत. हा महोत्सव पर्यटनासाठी आहे की विशिष्ट हॉटेल व्यावसायिकांचे उत्पन्न वाढवण्यासाठी ? असा तिखट सवाल उपस्थित केला जात आहे. प्रशासनाने लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता घेतलेला हा निर्णय म्हणजे लोकशाही मूल्यांची पायमल्ली असल्याची भावना व्यक्त होत आहे.

### मेळघाटाच्या संवेदनशील पर्यावरणाशी खेळ

नरनाळा हा मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचा संवेदनशील भाग आहे. रात्रीच्या वेळी होणारा गोंगाट, प्रखर प्रकाशझोत आणि वाढती गर्दी यामुळे वन्यजीवांच्या अधिवासात मानवी हस्तक्षेप वाढणार आहे. एकीकडे वन्यजीव संरक्षणाचे गोडवे गायचे आणि दुसरीकडे त्याच परिसरात दंगा-मस्तीचे कार्यक्रम आयोजित करायचे, हा प्रशासनाचा दुटप्पीपणा नाही का ? यातून जैवविविधतेचे संरक्षण होणार की ऱ्हास ? असा प्रश्न विचारला जात आहे.

### शेतकरी संकटात, प्रशासन जल्लोषात!

मेळघाट परिसरात सध्या वन्यप्राण्यांचा हैदोस वाढला आहे. रानडुक्कर आणि नीलगायींनी पिके उद्ध्वस्त केली आहेत, तर हिंसक प्राण्यांच्या भीतीने शेतकरी शेतात जायला घाबरत आहेत. अशा भीषण परिस्थितीत शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम प्रशासन करत आहे. 'शेतकऱ्याला मदतीची गरज असताना, प्रशासन नाच-गाण्यावर कोट्यवधींची उधळपट्टी करत आहे, हा अकोलेकरांचा अपमान आहे.'

### पर्यटनाचा उद्देश की कंत्राटदारांचे भले ?

पर्यटनवाढीसाठी कायमस्वरूपी सोयीसुविधा निर्माण करणे आवश्यक असते. मात्र, इथे केवळ इव्हेंट करून पैसे संपवण्याचा घाट घातला गेला आहे. यातून स्थानिकांना कोणताही शाश्वत रोजगार मिळालेला नाही. केवळ इव्हेंट कंपन्यांचे खिसे भरण्यासाठी अकोलेकरांच्या हक्काच्या पैशावर डल्ला मारला जात असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. नरनाळा महोत्सव हा पर्यटनाच्या नावाखाली झालेला एक 'नियोजित आर्थिक अनियमितता' वाटत असून, याची उच्चस्तरीय चौकशी होणे गरजेचे आहे.

# मुंबईत सत्ता स्थापनेचा आज होणार फैसला !

## मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री यांची महत्त्वपूर्ण बैठक

प्रतिनिधी २५ जानेवारी



**मुंबई :** राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका झाल्या असून मुंबईसह अनेक ठिकाणी महापौर पदाकरिता रस्सीखेच बघायला मिळत आहे. महापौर आरक्षण सोडत निघाली असून अनेक दिग्गजांच्या आशेवर पाणी फिरल्याचे बघायला मिळत आहे. त्यामध्येच आज महत्त्वाची बैठक मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांत होणार असून त्यात मुंबई महानगरपालिकेत सत्ता स्थापनेचा निर्णय होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका झाल्या असून या निवडणुकीत भाजपा सर्वात मोठा पक्ष ठरला. नंबर २ चा पक्ष शिवसेना शिंदे गट ठरला. मात्र, अजित पवारांच्या पक्षाला समाधानकारक कामगिरी या निवडणुकीत करता आली नाही. महापौर आरक्षण सोडत देखील काढण्यात आली. मात्र, असे असतानाही महापौर पदाचा तिढा अजून काही सुटलेला नाही. मुंबई, मीरा भाईंदर, ठाणे, कल्याण डोंबिवली या महापालिकांवर युतीचा महापौर होणार असे भाजपा आणि शिवसेना शिंदे गटाकडून सांगण्यात आले. आज याबाबतच सायंकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात बैठक होईल. त्याच बैठकीत महापौर पदासोबतच अनेक पदांवर निर्णय होतील, अशी माहिती सुत्रांनी दिली आहे. मुख्यमंत्र्यांच्या दावोस दौऱ्यामुळे महापालिकांतील सत्तावाटप रखडले होते, फडणवीस मुंबईत परतल्याने हालचालींना वेग आला.

मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, मीरा भाईंदर, नवी मुंबई महापालिकांबाबत एकत्रित निर्णय होण्याची शक्यता आहे. मुंबई मनपात शिवसेना (शिंदे गट) ला सन्मानपूर्वक पदे हवीत. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षामुळे शिंदे गटाकडून महत्वाची पदे मागितली जाणार असल्याची माहिती मिळत आहे. उपमहापौर, स्थायी समिती, सुधार समिती, बेस्ट समिती अध्यक्षपदांची शिवसेनेला अपेक्षा असल्याची माहिती सुत्रांकडून मिळत आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपला ८९ जागा मिळाल्या आहेत. मात्र, बहुमतासाठी शिवसेनेच्या पाठिंब्याची गरज असणार आहे. शिवसेनेच्या २९ जागा असल्या तरी सत्तेत मोठा वाटा मिळावा, अशी ठाम भूमिका त्यांची आहे. कारण एकनाथ शिंदे यांना माहिती आहे की, आपल्या मदतीशिवाय भाजपा मुंबई महापालिकेवर सत्ता स्थापन करू शकणार नाही.

भाजपने मुख्यमंत्रिपद शिंदेंना दिल्याने महापौरपद देण्यास हरकत नसल्याचा सूर देखील आहे. मीरा-भाईंदरमध्ये भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी स्थानिक पातळीवर हालचाली सुरू आहेत. कल्याण-डोंबिवलीत मनसेने शिंदे गटाला पाठिंबा दिला. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या आजच्या बैठकीत नक्की काय होते, याकडे सर्वांच्या नजरा आहेत. दोन्ही बाजूंनी सांगितले जात आहे की, महापौर हा युतीचाच होणार आहे.

# ईश्वर चिठ्ठीच्या प्रभागावर वाढला दबाव

## महापौर निवडणूकीचा कार्यक्रम झाला जाहिर



प्रतिनिधी २५ जानेवारी

**अकोला:** ज्या प्रभागात ईश्वर चिठ्ठीने उमेदवार निश्चित केला गेला होता. त्या प्रभागातील विजयी उमेदवारावर मुस्लिम समाजातून दबाव वाढल्याचे चित्र आहे. अकोला महानगरपालिकेतील सत्तास्थापनेचे गणित जुळले असून भाजप व मित्रपक्षांची सत्ता स्थापन होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. भाजपच्या नेतृत्वाखाली 'शहर सुधार आघाडी' स्थापन करण्यात आली. भाजपला आमचा पाठिंबा नसून शहर सुधार आघाडीला पाठिंबा असल्याचे मत या प्रभागातील नगरसेवकांनी व्यक्त केले आहे. दरम्यान, भाजपला पाठिंबा देणाऱ्या मुस्लिम नगरसेवकांवर दबाव वाढल्याची माहिती असून ते खुलासे करत फिरत असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

महापालिकेतील एकूण संख्याबळ पाहता भाजपकडे ३८ नगरसेवक आहेत. त्यांना शिंदे गट (१), अजित पवार गट (१), शरद पवार गट (३) व शहर विकास आघाडी (१) यांचे पाठबळ मिळाल्याने एकूण संख्याबळ ४४ वर पोहोचले असून स्पष्ट बहुमत पूर्ण झाले आहे. शहर सुधार आघाडीचे गटनेते म्हणून पवन महल्ले यांची स्वाक्षरी या पत्रावर असून हे पत्र अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयात सादर करण्यात आले आहे.

या घडामोडींमुळे काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी व उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या नगरसेवकांचे सत्तास्थापनेचे स्वप्न भंग पावल्याचे चित्र आहे. सोमवारी विभागीय आयुक्तांकडून अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर ३० जानेवारी रोजी महापौर निवड होईल.

### महापौर पद निश्चित नावे प्रदेशाकडे

अकोला महापौर पदासाठी भाजपने स्थानिक पातळीवर नाव निश्चित केले आहे. असे असताना सोनाली अंधारे, प्राची काकड, नितु जगताप, शारदा खेडकर, रश्मी अवचार, वैशाली शेळके आणि एका महिला नगरसेविकेचे नाव प्रदेश पातळीवर पाठविले आहे. स्थानिक पातळीवर नाव निश्चित असताना प्रदेश पातळीवर नाव निश्चितीचा देखावा का असा प्रश्न शहर सुधार आघाडीत विचारला जात आहे. दरम्यान, शहर सुधार आघाडी महापौर पदाच्या नावाची निश्चिती करणार आहे की भाजप प्रदेश असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**सिटी न्यूज सुपरफास्ट**

**सुचना**

सर्व एजंट, प्रतिनिधी, वाचक, यांना कळविण्यात येते की, दि. २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त दै. सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालयाला सुट्टी राहणार आहे. त्यामुळे दि. २६ जानेवारी २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.


**- वितरण व्यवस्थापक**

# जि. प. निवडणुकीआधीच शेतकऱ्यांना योजनेचे ४,००० रु मिळणार?

प्रतिनिधी २५ जानेवारी

**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या नमो शेतकरी सन्मान निधी योजनेबाबत महत्त्वाची माहिती समोर येत आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून दरवर्षी ६ हजार रुपयांची मदत दिली जाते.

सध्या या योजनेच्या पुढील हप्त्याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले असून, हा हप्ता फेब्रुवारी महिन्यात जमा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विशेष म्हणजे जिल्हा परिषद निवडणुकीआधीच शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम जमा होऊ शकते, अशी चर्चा सुरू आहे. नमो शेतकरी सन्मान निधी योजना ही केंद्र सरकारच्या पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या धर्तीवर राज्य सरकारने सुरू केली आहे. पीएम किसान योजनेअंतर्गतही शेतकऱ्यांना वर्षाला ६ हजार रुपये दिले जातात. आतापर्यंत या योजनेचे २१ हप्ते शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले असून, २२वा हप्ता लवकरच वितरित केला जाणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, हा हप्ता देखील पुढील महिन्यात शेतकऱ्यांना मिळणार आहे.






## महापौर व उपमहापौर निवडीचा कार्यक्रम जाहीर; ३० जानेवारीला विशेष सभा

**अमरावती :** अमरावती महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर निवडीचा कार्यक्रम अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आला आहे. महानगरपालिकेची पहिली विशेष सर्वसाधारण सभा शुक्रवार, ३० जानेवारी रोजी आयोजित करण्यात आली असून, याच सभेत महापौर व उपमहापौर पदासाठी निवड प्रक्रिया पार पडणार आहे.

ही विशेष सभा सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात होणार असून, महापौर पदासाठी सर्वसाधारण सभासदांमधून निवड करण्यात येणार आहे. महापौर व उपमहापौर पदाचा कार्यकाळ अडीच वर्षांचा असणार असून, ही निवड हात वर करून मतदानाद्वारे केली जाणार आहे.

निवड प्रक्रियेसाठी जिल्हाधिकारी आशीष येरेकर हे पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहणार असून, नामनिर्देशन पत्रांची छाननी त्यांच्या उपस्थितीत होणार आहे. महापौर व उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन प्रक्रिया २७ जानेवारीपर्यंत सुरू राहणार आहे.

# विकास कामे वेळेत करून निधीचे योग्य व्यवस्थापन करा

### ◆ लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन विकास कामे करा ◆ निधी वेळेत खर्च करण्याचे बैठकीत दिले निर्देश

प्रतिनिधी २५ जानेवारी



**अमरावती:** जिल्हा नियोजन समितीचा निधी रोजगारनिर्मितीवर खर्च करण्यावर भर द्यावा. यातून लोकाभिमुख विकास कामे, प्रशासनातील गतिमानता आणि पारदर्शकता या समन्वयाने जिल्ह्यातील विकास कामे वेळेत करावीत, तसेच निधीचे योग्य व्यवस्थापन करावे, असे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात पालकमंत्री श्री.बावनकुळे यांनी जिल्हा नियोजन समितीची बैठक घेतली. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, बळवंत वानखडे, अमर काळे, आमदार किरण सरनाईक, संजय खोडके, रवि राणा, सुलभा खोडके, प्रताप अडसड, केवलराम काळे, प्रविण तायडे, राजेश वानखडे, उमेश उर्फ चंदू यावलकर, गजानन लवटे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मनपा आयुक्त सौम्या शर्मा, पोलिस आयुक्त राकेश ओला, जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या बैठकीत लोकप्रतिनिधी हे प्रशासनाच्या लोकाभिमुखकतेसाठी, विकास कामांसाठी कार्यरत असतात. त्यामुळे लोकप्रतिनिधींना अनुपालन अहवालातील माहिती तात्काळ द्यावी. येत्या राज्यस्तरीय बैठकीत जिल्ह्यातील विकास कामांना निधी वाढवून घेऊ. घराच्या जमिनीचा पट्टेवाटपाचा कार्यक्रम प्राधान्याने हाती घेण्यात आला आहे. राज्यातील एकही व्यक्ती पट्ट्याविना राहू नये, यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय नियोजनात विविध महत्त्वाच्या क्षेत्रांसाठी भरीव निधीची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये नागरी विकास आणि आरोग्य क्षेत्राला विशेष प्राधान्य देण्यात आले असून, नागरी क्षेत्राच्या विकासासाठी ७३ कोटी रुपये, तर आरोग्य सेवांच्या सक्षमीकरणासाठी ७२ कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित आहे. पायाभूत सुविधांच्या दृष्टीने रस्ते विकासासाठी ३८ कोटी रुपये आणि ऊर्जा विकासासाठी ३० कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. ग्रामीण भागाच्या विकासासाठी २७ कोटी रुपये, कृषी व संलग्न सेवा क्षेत्रासाठी ४० कोटी रुपये आणि पाटबंधारे व पूर नियंत्रणासाठी १३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

शैक्षणिक आणि सामाजिक स्तरावर शासनाने विशेष लक्ष केंद्रित केले असून, सामान्य शिक्षणासाठी २३ कोटी रुपये, महिला व बाल विकासासाठी १२ कोटी रुपये आणि जिल्ह्याच्या ऐतिहासिक वारशाच्या संवर्धनासाठी म्हणजेच तीर्थक्षेत्र, पर्यटन व गड किल्ल्यांच्या विकासासाठी १७ कोटी रुपयांची तरतूद आहे. याव्यतिरिक्त सामान्य विकासासाठी ५० कोटी रुपये राखीव ठेवण्यात आले आहेत.

वाटप करण्यात आलेल्या निधीचा यंत्रणांनी विनियोग व आतापर्यंत झालेल्या कामाबाबत तातडीने अहवाल सादर करावा. तसेच मंजूर कामे पूर्ण करण्यासाठी तातडीने निविदा प्रक्रिया राबवून, सर्व निधी मार्च २०२६ पूर्वी खर्ची पडेल, असे सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना सर्व संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. कामात दिरंगाई न करता विहित मुदतीत कामे पूर्ण करण्याचे निर्देश पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी यावेळी दिले.

जिल्ह्यातील संत्रा पट्ट्यात आधुनिक तंत्रज्ञानाचे पर्व सुरू झाले आहे. जिल्हा प्रशासन आणि 'हार्डकॅसल ?ग्रोटेक' यांच्यात 'एआय' आधारित शेतीसाठी सामंजस्य करार यावेळी करण्यात आला. या उपक्रमांतर्गत वरुड, मोर्शी, चांदूर बाजार आणि अचलपूर तालुक्यांतील १६० एकर क्षेत्रावर कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उपग्रह प्रतिमांच्या मदतीने फळगळ व कीड नियंत्रण केले जाईल. ४२ लाख रुपयांच्या या प्रकल्पामुळे हवामान बदलाच्या संकटात संत्रा उत्पादकांना अचूक शेतीचे पाठबळ मिळून उत्पादकता वाढण्यास मदत होणार आहे. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेत जोड रस्ते व जल पुनर्भरण योजनेंतर्गत अशासकीय संस्थेच्या माध्यमातून शेत जोड रस्ते तयार करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय व लोक जागर स्वयंसेवी संस्था, अंजनगाव सुर्जी यांच्यासोबत सामंजस्य करार करण्यात आला.

## गौरक्षणला आध्यात्मिक व वैज्ञानिक महत्त्व - परिमल नळकांडे



प्रतिनिधी २५ जानेवारी

**दर्यापूर :** संस्कृतीमध्ये गौरक्षनाला आध्यात्मिक महत्त्व जरी असले तरी वैज्ञानिक दृष्टिकोनातून गोरक्षण ही काळाची गरज आहे त्यामुळे गोरक्षण ही लोक चळवळ व्हायला पाहिजे असे प्रतिपादन परिमल नळकांडे अजय किशोरजी वर्मा यांनी चंडिकापूर येथे सुसज्ज अशा स्थापन केलेल्या श्री प्रयागदत्त गौरक्षण संस्थेच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून प्रतिपादन केले. भारत देशाला माता मानणारी इथली संस्कृती असून गाय ही परमपूजनीय आहे. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था ही गाईच्या संगोपनावर आधारित होती ती आता लोप पावत चालली आहे आणि आर्थिक आर्थिक व मनुष्यबळाची कमतरता यामुळे गाईचे पालन पोषण करणे शक्य होत नाही त्यामुळे गौरक्षण संस्था उघडणे हे अगत्याचे झाले आहे. कॅन्सर सारख्या दुर्धर आजारावर सुद्धा गोमूत्र हे प्रभावी औषध ठरू शकते असा दावा शास्त्रज्ञांनी संशोधनातून केला आहे असेही परिमल नळकांडे यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्य गोरक्ष समितीचे सदस्य सुनील सूर्यवंशी यांनी गोरक्षणाचे महत्त्व व प्रयागराज गौरक्षण स्थापने मागील अजय किशोरजी वर्मा यांचे योगदान तसेच अमरावती महानगर संघाचालक उल्हासजी बपोरीकर यांनी पंचपरिवर्तनाच्या माध्यमातून समाजामध्ये होऊ घातलेल्या कार्यक्रमाची माहिती दिली. यावेळी व्यासपीठावर अजय किशोरजी वर्मा, अरविंद बाबूजी नळकांडे, सुरेंद्र बुरंगे, प्रशांत महाजन, सुनील डिके, निलेश मोपारी, गानोजी उपस्थित होते.

## तोंगलाबाद येथे २८ जानेवारीला भव्य यात्रा महोत्सव

### ◆ २६ जानेवारीला प्रति इंदोरीकर गंगाराम महाराज राऊत यांचे विनोदी कीर्तन

प्रतिनिधी २५ जानेवारी



**दर्यापूर:** तालुक्यातील तोंगलाबाद येथे ग्रामदैवत श्री संत हनुमान महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त दिनांक २० जानेवारी पासून सुरू झालेल्या ग्रामदैवत संत हनुमान महाराज पुण्यतिथी उत्सवाची सांगता २८ जानेवारी रोजी होणार असून सकाळी ९ वाजता काल्याचे कीर्तन व ११ वाजता गावातून श्रींची पालखी मिरवणूक निघणार आहे.

यामध्ये ९५ हजार रुपयांचे बक्षिसे असणारी साप्रदायिक दिंडी स्पर्धा संपन्न होणार आहे.यामध्ये प्रथम बक्षीस २१ हजार,द्वितीय बक्षीस १६ हजार, तृतीय बक्षीस १२ हजार, चतुर्थ बक्षीस १० हजार, पाचवे बक्षीस ८ हजार, सहावे बक्षीस ६ हजार, सातवे बक्षीस ५ हजार पाचशे, आठवे बक्षीस ५ हजार, नववे बक्षीस ३ हजार पाचवे रूपये राहणार आहेत, तसेच उत्कृष्ट मृदुंगचार्य २ हजार, उत्कृष्ट गायनाचार्य २ हजार, उत्कृष्ट पेहराव १ हजार सहाशे, उत्कृष्ट विणेकरी १ हजार पाचशे रूपये बक्षीस असणार आहे, तसेच बक्षीस न मिळणाऱ्या दिंडीला ३ हजार रूपये मानधन देण्यात येणार आहे. त्यानंतर दुपारी ४ वाजता दहीहंडी व बक्षीस वितरण सोहळा व दुपारी ५ वाजता महाप्रसाद संपन्न होणार आहे तर संध्याकाळी ७ वाजता लाखो रुपयांची भेटवस्तु असणारा लकी ड्रॉ सोडत निघणार असून संध्याकाळी ७ वाजता वऱ्हाडी हास्यकवी संमेलन आयोजित करण्यात केले आहे. ॲड. अनंत खेडकर, नरेंद्र इंगळे, विजय पाटील, नितीन वरनकर, विलास ठोसर, दिनेश मोडोकार, रवींद्र महले, रणजीत गणोदे आदी कविवर्य सहभागी होणार आहे.

## जि. प. शाळेत शिक्षकाकडून अमानुष मारहाण; विद्यार्थ्यास गंभीर दुखापत

### ◆ पिंपळगावराजा येथील धक्कादायक प्रकार, शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी २५ जानेवारी



**पिंपळगावराजा :** येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षकाने विद्यार्थ्यावर अमानुष मारहाण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या मारहाणीत संबंधित विद्यार्थी जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी संबंधित शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राप्त माहितीनुसार, शाळेतील शिक्षकाने किरकोळ कारणावरून विद्यार्थ्याला बेदम मारहाण केली. मारहाणीदरम्यान विद्यार्थ्याला गंभीर दुखापत झाली. घटनेनंतर पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात आला असून शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने दखल घेतली असून संबंधित शिक्षकाविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे. शाळा ही ज्ञान, संस्कार आणि सुरक्षिततेचे केंद्र असावे; मात्र अशा घटनांमुळे संपूर्ण शिक्षण व्यवस्थेची प्रतिमा मलीन होत असल्याची भावना पालक वर्गातून व्यक्त केली जात आहे. दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## अमरावतीत बालनाट्यांची रंगतदार मेजवानी; ८९ नाटकांच्या सादरीकरणाने प्राथमिक फेरीला प्रारंभ

प्रतिनिधी २५ जानेवारी



**अमरावती :** शहरात बालकलावंतांच्या सृजनशीलतेला व्यासपीठ देणाऱ्या बाल नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला उत्साहात सुरुवात झाली आहे. या स्पर्धेत तब्बल ८९ बालनाटकांचे सादरीकरण होणार असून, उद्घाटन कार्यक्रम छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात पार पडला.

बालकलावंतांच्या अभिनय, संवादफेक, कल्पकता आणि सामाजिक आशय मांडणाऱ्या नाटकांमुळे नाट्यगृहात चैतन्यमय वातावरण निर्माण झाले आहे. विविध शाळा व संस्थांचे विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले असून, प्राथमिक फेरीनंतर पुढील फेरीसाठी सर्वोत्तम नाटकांची निवड केली जाणार आहे.

बालवयातच रंगभूमीची ओळख निर्माण व्हावी, अभिनय कौशल्याला चालना मिळावी आणि सांस्कृतिक जाण विकसित व्हावी या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. येत्या काही दिवसांत विविध विषयांवरील बालनाट्यांचे सादरीकरण रसिकांसाठी पर्वणी ठरणार आहे.

## भातकुलीत एपीएमसी स्थापनेचा मार्ग मोकळा

प्रतिनिधी २५ जानेवारी




**अमरावती :** विभाजन संचालक मंडळ बरखास्त भातकुली येथे स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी) स्थापन करण्याचा बहुप्रतिक्षित मार्ग अखेर मोकळा झाला आहे. यासाठी आवश्यक असलेले अमरावती विभाजन संचालक मंडळ बरखास्त करण्यात आल्याने एपीएमसी स्थापनेच्या प्रक्रियेला गती मिळणार आहे. प्राप्त माहितीनुसार, भातकुली परिसरातील शेतकरी व व्यापाऱ्यांकडून स्वतंत्र एपीएमसी स्थापनेची मागणी सातत्याने होत होती. मात्र अमरावती विभाजन संचालक मंडळ अस्तित्वात असल्याने निर्णय प्रक्रियेत अडथळे निर्माण होत होते. आता हे मंडळ बरखास्त झाल्याने भातकुली एपीएमसी स्थापनेचा अडसर दूर झाला आहे. या निर्णयामुळे भातकुली व परिसरातील शेतकऱ्यांना आपला शेतमाल विक्रीसाठी अमरावतीवर अवलंबून राहावे लागणार नाही. स्थानिक स्तरावर बाजारपेठ उपलब्ध झाल्याने वाहतूक खर्चात बचत होऊन शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. दरम्यान, एपीएमसी स्थापनेच्या पुढील प्रशासकीय प्रक्रियेस सुरुवात होणार असून लवकरच यासंदर्भातील अधिकृत घोषणा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## जनसंवादात ७४ तक्रारींचा पाऊस; पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा नागरिकांशी थेट संवाद

प्रतिनिधी २५ जानेवारी



**अमरावती :** पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवार २४ जानेवारी रोजी येथील विश्रामगृहात आयोजित जनसंवाद कार्यक्रमात नागरिकांच्या समस्या व तक्रारी थेट जाणून घेतल्या. या कार्यक्रमात जिल्ह्याभरातून एकूण ७४ निवेदनं प्राप्त झाली.

जनसंवाद कार्यक्रमात वीज बिल, मालकी हक्काचे प्रश्न, रस्ते, नोकरी, कृषी विषयक अडचणी, शेतकरी आत्महत्या, घरकुल, पाणीपुरवठा, क्रीडा, आरोग्य, बांधकाम आदी विविध विषयांवरील तक्रारी नागरिकांनी मांडल्या. अनेक नागरिकांनी वैयक्तिक समस्यांची निवेदनं सादर करत पालकमंत्र्यांशी थेट संवाद साधला. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागरिकांच्या निवेदनांची गांभीर्याने दखल घेत संबंधित तक्रारींवर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना प्रशासनातील अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलिस आयुक्त राकेश ओला, मनपा आयुक्त सौम्या शर्मा, पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## अमरावतीत आंतरजिल्हा बदलीचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता

### ◆ बिंदू नामावलीनुसार पदे भरण्याबाबत ग्रामविकास विभागाकडून सकारात्मक संकेत

प्रतिनिधी २५ जानेवारी

**अमरावती:** अमरावती जिल्ह्यात आंतरजिल्हा बदलीने येण्यासाठी अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या शिक्षकांसाठी दिलासादायक घडामोड घडली आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने आंतरजिल्हा बदलीचे एकूण सहा टप्पे राबवूनही पेसा व नॉन-पेसा क्षेत्रातील तांत्रिक अडचणींमुळे अमरावती जिल्ह्यातील भूमिपुत्र शिक्षकांना अद्याप स्वगृही परतता आले नव्हते. मात्र, आता शासनस्तरावर हालचाली वेगाने सुरू झाल्याने आंतरजिल्हा बदलीचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

अमरावती जिल्हा परिषदेत सध्या पेसा व नॉन-पेसा क्षेत्रात मिळून सुमारे १२०० हून अधिक शिक्षक पदे रिक्त आहेत. शिक्षकांच्या अभावामुळे अनेक शाळांवर बंद पडण्याची वेळ आली असून, गेल्या वर्षी जिल्हा परिषदेच्या ११ शाळा विद्यार्थी पटसंख्या नसल्याने बंद झाल्या. शिक्षक उपलब्ध नसल्याने पालक जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मुलांचा प्रवेश घेण्यास टाळाटाळ करीत असल्याचे चित्र आहे. यामुळे शिक्षण हक्क कायदा २००९ तसेच संविधानातील कलम २१ व ४५ अंतर्गत अपेक्षित असलेल्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या पार्श्वभूमीवर दर्यापूर नगर परिषदेचे नगरसेवक व भाजपाचे सरचिटणीस . रोशन कट्यारमल यांनी मंत्रालय, मुंबई येथे अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांची भेट घेऊन बिंदू नामावलीनुसार आंतरजिल्हा बदलीने रिक्त पदे भरण्याची मागणी केली. या मागणीची दखल घेत पालकमंत्री बावनकुळे यांनी ग्रामविकास विभागाला बिंदू नामावलीनुसार पदे भरण्याबाबत सकारात्मक सूचना दिल्याची माहिती मिळाली आहे.

तसेच ग्रामविकास विभागाच्या उपसचिव (बांधकाम भवन, मुंबई) यांच्याशी झालेल्या चर्चेत जिल्हा परिषद अमरावती यांना बिंदू नामावलीनुसार पदे भरण्यासाठी आवश्यक सूचना दिल्या जातील, असे आश्वासन देण्यात आले आहे.

## समाजसेवी राजाभाऊ डोणगावकर

आपण ज्या समाजात जन्मलो त्या समाजासाच्या सर्वांगिण विकासासाठी पुढाकार घेणारे जैन समाजातील व्यक्तीमत्व म्हणजे आदरणीय राजाभाऊ डोणगावकर साहेब.

वाशीम जिल्ह्यातील कारंजा (लाड) म्हणजे जैन समाजाचे सर्वांगिणदृष्ट्या समृद्ध शहर. कारंजा नगरीमध्ये महावीर ब्रम्हचर्याश्रम जैन गुरूकुल आहे. गुरुकुल प्रणालीचे जनक गूरूदेव समंतभद्र महाराज यांच्या पावन विचारातून साहेबांनी आपल्या समाजसेवेच्या कार्याची सुरूवात केली.

साहेबांनी नोकरीसोबतच राष्ट्रीय काँग्रेसपक्षामध्ये विविध पदावर कार्यरत असताना जैन समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी पुढाकार घेतला.आपल्या जैन समाजातील गरजू व होतकरू पात्रता असलेल्या तरुणांना कारंजा लाड ,वेरूळ येथील जैन गुरूकुल मध्ये तसेच गुरूदेव समंतभद्र प्राथमिक शाळेमध्ये नोकरी दिली आहे.



गुरूदेव समंतभद्र प्राथमिक शाळा,कारंजा लाड येथे एक शिक्षक सेवानिवृत्त होणार होते.त्या शिक्षकाच्या निवृत्तीला एक वर्षाचा कालावधी शिल्लक असताना साहेबांनी जैन समाजातील डी.एड. आणि टी.ई.टी. उत्तीर्ण असलेल्या योग्य उमेदवाराचा शोध घेण्यास प्रारंभ केला. यासाठी मलाही साहेबांनी जबाबदारी दिली होती.मी विदर्भ व मराठवाड्यामध्ये शोध घेतला,परंतु डी.एड. टीईटी उत्तीर्ण असलेला उमेदवार मला शोधण्यास अपयश आले. मात्र,साहेबांना योग्य, गरजू, होतकरू पात्रताधारक उमेदवार हिंगोलीमध्ये सापडला. साहेबांनी त्या उमेदवारास कारंजा येथे बोलावले. त्याची सर्व व्यवस्था करून दिली. आता नियुक्ती केल्यानंतरही शिक्षण विभागाचा मान्यता आदेश मिळविण्यासाठी अनेक सोपस्कार करावे लागतात.साहेबांनी ठहाठ सोपस्कार स्वत: पार पाडून त्या गरजू उमेदवाराचा मान्यता आदेश प्राप्त केला. साहेब,आश्रममध्ये अथवा ईतर जैन संस्थेमध्ये रिक्त जागा असल्यास आपल्या जैन समाजातील पात्रताधारक,गरजू उमेदवाराला नोकरी मिळण्यासाठी अविरत पुढाकार घेतात.आज साहेबांनी वयाचे ८० वर्ष पूर्ण करून ८१ व्या वर्षात पदार्पण केले आहे.या वयातही त्यांची समाजसेवा अविरत सुरु आहे.

साहेबांचे माझे मागील ३० वर्षापासून जिव्हाळ्याचे संबंध आहेत.जैन समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी धडपडणारे साहेब यांचे कार्य कौतुकास्पद आहे. साहेबांचा संपूर्ण परिवार त्यांच्या समाजसेवेच्या कार्यात सहभागी असतो. आज २५ जानेवारी २०२६ रोजी कारंजा लाड येथील श्री.महावीर ब्रम्हचर्याश्रम जैन गुरूकुल च्या परिसरातील पं.देवकीनंदन सभागृहामध्ये साहेबांच्या ८० व्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन सकाळी ९.३० वाजता करण्यात आले आहे.साहेबांच्या समाजसेवेच्या कार्याला माझा सलाम.साहेबांना उदंड ,निरोगी आयुष्य लाभो,हिच ईश्वराचरणी प्रार्थना.

**प्रांजल जैन**
**अनसिंग (वाशीम)**

## रेल्वे ब्लॉकमुळे बडनेरा-नाशिक, भुसावळ मेमू २९ व ३० रोजी रद्द

### ◆ जलंब स्थानकावर यार्ड रिमॉडेलिंग व इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंगचे काम

प्रतिनिधी २५ जानेवारी



**अमरावती :** जलंब रेल्वे स्थानक येथे यार्ड रिमॉडेलिंग व इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंगचे काम हाती घेण्यात आल्याने २९ व ३० तारखेला रेल्वे ब्लॉक जाहीर करण्यात आला आहे. या ब्लॉकमुळे बडनेरा–नाशिक व भुसावळ मार्गावरील मेमू रेल्वे सेवा रद्द करण्यात आली आहे. प्राप्त माहितीनुसार, सुरक्षित व आधुनिक रेल्वे वाहतूक सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने जलंब स्थानकावर महत्त्वाची तांत्रिक कामे सुरू करण्यात येणार आहेत. या कामासाठी ब्लॉक घेण्यात येत असून, त्याचा थेट परिणाम प्रवासी सेवांवर होणार आहे.

दरम्यान, संबंधित तारखांना प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी पर्यायी प्रवास व्यवस्था करण्याचे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे. काम पूर्ण झाल्यानंतर रेल्वे सेवा पूर्ववत करण्यात येणार असल्याचेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## मार्कलिस्ट हरवली

सिध्दीमा पवन शर्मा वय २१ वर्ष व्यवसायः शिक्षण (फिजीयोथेरपी कोर्स) रा. एमआयडीसी क ०२,शर्मा पवन बेकरी, सावतराम पॉलीमर्सच्या बाजुला यांची १० ची ओरिजिनल मार्कलिस्ट ५.११.२०२५ रोजी हरवली आहे. त्याचा शोध घेतला परंतु आढळली नाही. मार्कलिस्टचा कोणी दुरूपयोग करू नये म्हणून एमआयडीसी पोलिस स्टेशनला ११.११.२०२५ तक्रार केली आहे. याबाबत कोणाला माहिती असल्यास वरील पत्ता किंवा मो.न. ९९२२५०२५०१ वर संपर्क साधावा असे आवाहन सिध्दीमा पवन शर्मा यांनी केले आहे.

सिटी न्यूज अकोला

रविवार, दि. २५ जानेवारी २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# मनपात नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

प्रतिनिधी २५ जानेवारी

**अकोला:** २३ जानेवारी २०२६ रोजी अकोला महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने तसेच मुख्य लेखा अधिकारी बैजनाथ शेळके व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पुजन करून माल्यार्पण करण्यात आले. तसेच राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य आज दि. २३ जानेवारी रोजी मनपाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे उपस्थित सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांच्याद्वारे लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची सामुहिकरित्या शपथ घेण्यात आली. यावेळी मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, मनपा मुख्य लेखा अधिकारी बैजनाथ शेळके, उपायुक्त विजय पारतवार, दिलीप जाधव, विठ्ठल देवकते, अमोल डोईफोडे, अनिल बिडवे, यांचेसह इतर अधिकारी आणि कर्मचा-यांची उपस्थिती होती.

## शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयात स्नेहसंमेलन संपन्न



प्रतिनिधी २५ जानेवारी

**अकोला :** स्थानिक शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले.या संमेलनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू यांचा हस्ते संपन्न झाले. या संमेलनात क्रीडा स्पर्धे अंतर्गत रस्सीखेच, बुद्धिबळ स्पर्धा, गोळाफेक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्ये अनिकेत दंदी,संतोष प्रजापती, सलोनी सिरसाट, साक्षी वानखडे, श्रुतिका ठाकरे, वैष्णवी कराळे, वैभव माने, रुद्रा ठाकुर यांनी पारितोषिके पटकाविलीत. संमेलनात मेहंदी, स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, प्रश्न मंजुषा, गीत गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. गजल मुशायरात गोपाल मापारी, निलेश कवडे, एजाज शेख, दिगंबर खडसे, अमोल सिरसाट यांनी सहभाग नोंदवला. विविध स्पर्धा मध्ये वैष्णवी वैराळे, रूपाली डोंगरे, काजल वानखडे, सृष्टी कुलकर्णी, यांनी पारितोषिके प्राप्त केलीत. प्रा चंदा जैस्वाल, राहुल भगत मेघा पाचरे यांनी विविध स्पर्धाचे परीक्षण केले.

# आज जागतिक मतदान दिन

प्रतिनिधी २५ जानेवारी

## ♦ जनजागृती मोहीम राबवल्यावरही मतदानाचा टक्का कमी

**अकोला :** भारत हा लोकशाही प्रधान देश आहे . देशातील करोडो जनता मतदान करून सरकार निवडून देते . इतर देशांच्या तुलनेत भारताची लोकशाही मजबूत मानली जाते . मतदानाचे महत्त्व वाढावे याकरिता आज २५ जानेवारीला देशभरात राष्ट्रीय मतदान दिन साजरा केला जातो. या दिवशी नागरिकांना त्यांच्या मतदानाच्या अधिकाराची आणि लोकशाही कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी कार्यक्रम आयोजित केले जातात. यावर्षी १५ जानेवारी रोजी अकोला महानगरपालिका निवडणुका झाल्या, आणि दुसऱ्याच दिवशी १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर झाले. निवडणुकीच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास केवळ ५१.६१ टक्के मतदान झाले. जे अत्यंत कमी आहे आणि लोकशाहीसाठी चिंतेचा विषय आहे. मतदारांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे आणि लोकशाही व्यवस्थेत सक्रिय सहभाग वाढवणे हा मतदान दिनाचा उद्देश आहे. या महापालिका निवडणुकीत निवडणूक आयोगाने पद्धतशीर मतदार शिक्षण आणि जागरूकता कार्यक्रम करून देखील मतदानाचा टक्का अपेक्षेप्रमाणे वाढला नाही. महानगरपालिका निवडणुकीत आपल्या शहरातील केवळ अर्ध्या लोकांनी मतदान केले. तेव्हा ते लोकशाहीसाठी चांगले लक्षण नाही. प्रत्येक मतदान महत्त्वाचे आहे आपला हक्क बजावणे हे केवळ कर्तव्य नाही तर लोकशाही प्रति असलेली जबाबदारी देखील आहे. जर लोकशाही मजबूत करायची असेल तर मतदान हे एक दिवसाचे काम नसून जागरूक नागरिक असल्याचे दाखवून देण्याची पद्धत आहे.



### निवडणुकीआधी महानगरपालिकेने केली जनजागृती

◆महानगरपालिका निवडणुकीत चांगले मतदान व्हावे यासाठी महानगरपालिका प्रशासनाने मतदार जागरुकता मोहीम सुरू केल्या. पद्धतशीर मतदान शिक्षणाद्वारे जागरुकता निर्माण केली, तरीही मतदानाचा टक्का कमी राहिला. तेव्हा प्रत्येक निवडणुकीत मतदारांनी आपले राष्ट्रीय कर्तव्य समजून मतदान करायलाच पाहिजे. तेव्हाच लोकशाही निकोप आणि सुदृढ होऊ शकेल कारण कमी मतदान होणे हे चिंतेचे लक्षण आहे. यावर्षी चार चार ईव्हीएम मशीन असल्याने अनेक मतदारांमध्ये मतदान करताना गोंधळ उडाल्याचे पहावयास मिळाले

# श्री स्वामी अक्षयानंद सरस्वती महाराज यांच्या पुण्यस्मरणार्थ भागवत कथेची समाप्ती

प्रतिनिधी २५ जानेवारी



**आलेगाव:** अंबाशी येथे श्री स्वामी अक्षयानंद सरस्वती महाराज अंबाशी यांच्या पुण्यस्मरणार्थ भागवत कथेची समाप्ती व महाप्रसाद वितरण झाले.

भागवत ग्रंथाच्या कथे सोबतच सात दिवस रोज रात्री महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकारांचे कीर्तन सेवा संपन्न झाली स्वामी अक्षयानंद सरस्वती महाराजांनी या पूर्ण परिसरात भक्तीभाव रुजवीला, भक्तांना योग्य दिशा मार्गदर्शन करत सेवा कार्य शिकविले यासोबतच नामजप व संत सेवेचे बीज भक्तांच्या मनात रुजविले तसेच अनेक कार्य स्वामी अक्षयानंद सरस्वती महाराज यांनी या परिसरात केले. यामुळे त्यांच्या या पुण्यस्मरणनिमित्त सात दिवस भागवत साप्ताहाचे आयोजन करून कीर्तनरूपी ज्ञान सेवा अंबाशी विरक्ताश्रम ह्या त्यांच्या समाधी स्थळी करण्यात येते. कथा व हरी कीर्तन श्रवण करण्यासाठी गावातील व परिसरातील भक्त मंडळी मोठ्या संख्येने या ठिकाणी येत असते.महाराजांनी केलेल्या कार्याचे आठवणीना उजाळा या ठिकाणी मिळते व नविन ऊर्जा घेऊन जाण्याची चेतना मिळते. असे भक्तजन व्यक्त करतात. सप्ताहाच्या यशस्वी कार्यासाठी आश्रमाचे सेवेकरी,गावातील भक्त गण व परीसरातील भक्त मंडळी सतत कार्य करत असते.

# नरनाळा महोत्सव पोपटखेड अथवा शहानूर येथे साजरा करावा : डॉ.श्याम देशमुख

प्रतिनिधी २५ जानेवारी

## ♦ खासदार अनुप धोत्रे यांच्याकडे मागणी

**अकोट:** नरनाळा महोत्सव तालुक्याचे भूषण वाढवणारा आहे. परंतु महोत्सवाचा उद्देश सफल करायचा असेल तर तो शहानुर, पोपटखेड या भागात साजरा केला तर त्या भागातील आदिवासी लोकांना रोजगार उपलब्ध होईल. आदिवासी लोक संस्कृती जोपासना, वनसंवर्धन, गड किल्ले दर्शन तथा डोंगराळ दुर्गम भागातील जनजीवन जवळून बघता अनुभवता येते. या विषयाकडे डॉ. श्याम देशमुख यांनी खासदार अनुप धोत्रे यांचे लक्ष वेधले आहे.



महोत्सव सार्थक तेव्हाच होईल जेव्हा येणाऱ्या पर्यटकांना किल्ले दर्शन, जंगल भ्रमंती व ग्रामीण लोकांना रोजगार उपलब्ध करुन देऊ. अकोट शहानुर अंतर २२ कि. मी. आहे. त्यामुळे या सर्व बाबींचा विचार करवा या आयोजनाचे स्थळ शहानुर, पोपटखेड परीसरातच करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांचेशी चर्चा करुन देण्यात यावे.अशी मागणी मिटींग ला उपस्थित असलेल्या संजय गावंडे, पुरोषत्तम चौखंडे,राजूभाऊ नागमते, मनोज खंडारे,दिलीप बोचे, डॉ.ईंगोले,प्रभुदास तळोकार, विक्रम ठाकूर, गोपाल मोहोड, शिवराज कोरपे, डॉ. श्याम देशमुख सह पोपटखेड सरपंच विजेंद्र तायडे यांनी केली.

# न्याय मिळण्यासाठी शेतकऱ्याचे पंतप्रधानांना पत्र ; पंतप्रधान कार्यालयाकडून चौकशीचे आदेश

प्रतिनिधी २५ जानेवारी

**कुटासा :** शेतजमिनीचे क्षेत्रफळ प्रशासनाने कमी दाखविल्यामुळे अन्याय झालेले देवरी येथील शेतकरी हरिदास गणपतराव पातुर्डे यांनी पंतप्रधानांना पत्र पाठविले. त्यावर पंतप्रधान कार्यालयाने चौकशी करण्याचे आदेश दिल्यामुळे खळबळ उडाली आहे. मला न्याय न मिळाल्यास २६ जानेवारीनंतर बेमुदत उपोषण करेल,असा इशारा दिल्यामुळे दहीहांडा पोलिस स्टेशनचे ठाणेदार कर्मचाऱ्यांसह शेतकऱ्याच्या घरी पोहोचून शेतकऱ्याचे नेमके प्रकरण काय ते समजून घेतले.

शेतकरी हरिदास पातुर्डे यांनी पंतप्रधानांना लिहिलेल्या पत्रात म्हटले, माझ्या वडिलांची शेती बळेगाव (शेत स.नं. १०७, १०८) मध्ये आहे. परंतु स. नं. १०७ मध्ये मंडळ अधिकाऱ्यांनी चुकीचा फेरफारघेऊन घोळकेला. त्यानंतर सन १९७९ मध्ये भूमी अभिलेख विभागाने एकत्रीकरण राबविले, तेव्हा सुध्दा घोळ करण्यात आला. त्यामुळे मी वारंवार संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत आजवर न्याय मागत आलो आहे. मात्र बरेच वर्ष उलटून गेल्यानंतरही आतापर्यंत मला न्याय मिळालेला नाही. दरम्यान भूमी अभिलेख अमरावती प्रदेश अमरावती येथे कार्यरत महिला कर्मचाऱ्याने सुध्दा केवळ एवढा पत्रव्यवहार व खटाटोप का २७ आरचा फरक आहे, त्यामुळे करता, असे उर्मट उत्तर दिले. त्यामुळे आपणाला न्याय द्यावा, अशी मागणी सदर शेतकऱ्याने पंतप्रधानांकडे पत्राव्दारे केली होती.दरम्यान या पत्रावर पंतप्रधान कार्यालयाने महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवांना पत्र देऊन यासंदर्भात चौकशीचे आदेश दिले. न्याय मिळत नसल्यामुळे हताश झालेल्या देवरीच्या या शेतकऱ्याने उचललेल्या पवित्र्यामुळे प्रशासनात एकच खळबळ उडाली.दरम्यान शेतकरी हरिदास पातुर्डे यांच्या घरी दहीहांडा पोलिसांनी धाव घेत त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. देवरी येथील शेतकरी पातुर्डे यांच्याशी संपर्क साधला असता माझ्या मागण्यापूर्ण न झाल्यास मी उपोषणावर ठाम असल्याचे त्यांनी आमच्या प्रतिनिधी शी बोलताना सांगितले.

### शेतकऱ्याची बाजू समजून घेतली

◆त्या शेतकऱ्यांचे प्रकरण समजून घेण्यासाठी मी त्यांच्या घरी गेलो व प्रकरण समजून घेत प्रकरण जुने व महसूल विभागाचे असल्याने यावर योग्य ती कारवाई करावी असे पत्र तहसीलदार व भूमी अभिलेख विभागाला रवाना केले.

**गोपाल ढोले** ठाणेदार दहीहांडा पो स्टे

## माँ चैतन्य मीरा यांची आजपासून भागवत कथा



**अकोला:** श्री गोरक्षण संस्थान, भारतीय संस्कृती प्रचार परिषद अकोला तथा श्री भागवत सेवा समितीच्या संयुक्त विद्यमाने गोरक्षण रोड येथील गोरक्षण संस्थान येथे आज दिनांक २५ जानेवारी पासून गोरक्षण संस्थेत प्रारंभ होत आहे.ही कथा

दि ३१ जानेवारी पर्यंत नित्य दुपारी ३ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. भागवत प्रवचनकार माँ चैतन्य मीरा यांचे शनिवारी सायंकाळी गोरक्षण संस्थेत आगमन झाले. आगमन होताच त्यांचे पुष्पवर्षाव करून व शंखनाद करीत समितीच्या वतीने कृष्ण मूर्ती भेट देऊन भव्य स्वागत करण्यात आले. मातेने संस्थान मधील मंदिरात पूजा अर्चना करीत गोमातेची पाहणी केली.

# ‘उमंग’ कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना जीवनमूल्यांचे धडे

प्रतिनिधी २५ जानेवारी

**पातूर :** डॉ. वंदनाताई जगन्नाथराव ढोणे ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालय, पातूर येथे आयोजित ‘उमंग’ या सांस्कृतिक कार्यक्रम व स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांना जीवन कसे जगावे, अपयशाशी कसे लढावे आणि स्वतःची वेगळी ओळख कशी निर्माण करावी, याबाबत मान्यवरांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास माजी महिला अध्यक्ष व महाराष्ट्र राज्य सदस्य आशाताई मिरगे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना सांगितले की, जीवनात कधीही इतरांशी तुलना करू नये. प्रत्येक व्यक्तीची जागा





वेगळी असते. आपल्याला जे योग्य वाटते, ते प्रामाणिकपणे करणे महत्त्वाचे आहे. तुलनात्मक धोरणामुळे जीवनात असमाधान निर्माण होते, असे त्यांनी स्पष्ट केले. दुसरे प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध आयुर्वेदतज्ज्ञ डॉ. हर्षवर्धन मालोकार यांनी आपल्या विद्यार्थी जीवनातील आठवणी सांगत विद्यार्थ्यांना प्रेरित केले. जीवनात अपयश आले तरी खचून जाऊ नका. सातत्याने मेहनत केल्यास यश निश्चित मिळते. कष्ट करण्याची तयारी ठेवली तर संपूर्ण जग आपल्या हातात येऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी प्रा. ममता ताई इंगोले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, फक्त गुण मिळवणे म्हणजे यश नव्हे. जीवनात आपुलकी, मैत्री आणि संवाद खूप महत्त्वाचा आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने एक विश्वासू मित्र ठेवावा. कितीही अपयश आले तरी नैराश्याला बळी पडू नये किंवा आत्महत्येसारखा विचार कधीही करू नये, असे भावनिक आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. साजिद शेख म्हणाले, आयुर्वेद हे केवळ प्रोफेशन न मानता पॅशन म्हणून स्वीकारावे. हुशार डॉक्टरपेक्षा शिस्तबद्ध, प्रामाणिक आणि संवेदनशील डॉक्टर समाजाला आवश्यक आहे. पालकांनी शिक्षणासाठी खर्च केलेला पैसा नसून ते त्यांचे स्वप्न आहे; ते स्वप्न पूर्ण करणे हेच विद्यार्थ्यांचे खरे कर्तव्य आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले. या कार्यक्रमास प्राचार्या डॉ. जयश्री काटोले, उपप्राचार्य डॉ. अभय भोसकडे, जनसंपर्क अधिकारी धनंजय मिश्रा, डॉ. सोनाली महाजन तसेच विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष प्रणव महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती.

# होमगार्डच्या पदोन्नतीमध्ये घोळ ?

प्रतिनिधी २५ जानेवारी

**अकोला:** जिल्ह्यातील होमगार्ड सैनिकांची पंधरा ते वीस वर्षापासून पदोन्नती रखडली होती. याबाबत होमगार्ड सैनिकांनी पदोन्नती मिळण्याकरिता वारंवार मागणी केल्याने प्रशासनाने मुलाखती घेऊन पदोन्नतीचा मार्ग सुकर केला होता. परंतु जिल्हा कार्यालयातून काही अधिका-यांनी दिशाभूल करून या पद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणात घोळ केल्याचा आरोप होमगार्ड सैनिकांमध्ये होत आहे. होमगार्ड जिल्हा समादेशक यांच्या समितीने या पदोन्नती बाबत मुलाखती व लेखी परीक्षा घेऊन अहवाल होमगार्ड मुंबई कार्यालय येथे पाठविण्यात आला होता. या अहवालानुसार शासनाने जिल्ह्यातील होमगार्ड सैनिकांच्या पदोन्नती यादी जिल्हा कार्यालयात पाठविण्यात आली होती. परंतु यादी जिल्हा कार्यालयात दाबून ठेवण्यात आली होती.

मुलाखतीबाबत जिल्हा समादेशक यांना वारंवार विचारणा केल्यावरून ही यादी प्रसिद्धी करण्याचा निर्णय घेतल्यावर या यादीमध्ये काही जिल्हा कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांच्या संगनमताने खोट्या तक्रारी करून नियमात बसणाऱ्या सैनिकांना डावलण्याची चर्चा आहे. प्रशासनाने या गंभीर बाबीकडे लक्ष देणे गरजेचे आहे अशी मागणी केली जात आहे.

# कस्तुरीचे संस्थापक प्रा.ॲड. किशोर बुटोले यांना मानवसेवा परिवर्तन गौरव पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी २५ जानेवारी

**अकोला:** परिवर्तन प्रबोधिनी अमरावती संस्थेचा मानव सेवा परिवर्तन गौरव सन्मान येथील ’ कस्तुरी’ सामाजिक संस्थेचे संस्थापक प्रा. ॲड. किशोर बुटोले यांना प्रदान करण्यात आला. गायगाव मार्गावरील कस्तुरी परिसरात झालेल्या सत्कार समारंभास परिवर्तन प्रबोधिनीच्या अध्यक्ष प्रा.डॉ.शोभाताई रोकडे , समाजसेविका प्रतिभाताई आवारे, कांचन उल्हे ,कवी खुशाल गुल्हाने व सदस्य उपस्थित होते.

वऱ्हाडी साहित्यिक आबासाहेब कडू यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात मंचावर प्रा.डॉ.शोभा रोकडे , शिलाताई गहलोत , माजी आमदार वसंतराव खोटरे व यशवंत देशपांडे उपस्थित होते.

प्रा. ॲड. किशोर बुटोले व चमूने समाजातील उपेक्षितांच्या उन्नतीसाठी केलेले नि:स्वार्थ कार्य ,मानवतेचा दीप जपण्याची सातत्यपूर्ण ओढ आणि जनजागृतीसाठी अविरत प्रयत्न या सर्वांचा गौरव म्हणून परिवर्तन प्रबोधिनी या संस्थेद्वारे हा सन्मान प्रदान



करताना आनंद होत आहे. ह्या सेवाभावी प्रवासाला मानाचा मुजरा व आपली प्रदीर्घ वाटचाल अधिक व्यापक व प्रभावी होवो , असे प्रतिपादन परिवर्तन प्रा. डॉ. शोभा रोकडे यांनी केले. प्रा. ॲड.किशोर बुटोले यांना स्व. कल्पना नागोराव इंगोले यांच्या स्मृतीत ’ मानव सेवा परिवर्तन गौरव सन्मानाने गौरविले पुरस्काराचे स्वरूप शाल , श्रीफळ व स्मृतिचिन्ह असे होते. प्रा. ॲड.किशोर बुटोले यांनी कस्तुरीचा सेवाभाव आणि मागील १५ वर्षात झालेल्या सेवाकार्याचा परिचय देऊन उपस्थिताना कस्तुरी या संस्थेसोबत जुळण्याचे आवाहन केले. तसेच पुरस्कारासाठी निवड केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून प्राप्त पुरस्कार श्री संत गजानन महाराजांच्या चरणी समर्पित करत असल्याचे प्रतिपादन केले. माजी आमदार वसंतराव खोटरे यांनी कस्तुरीच्या सेवा कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे संचालन संजय गायकवाड यांनी तर आभार प्रदर्शन संजय ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सीए घनश्याम चांडक, वसंतराव देशमुख , चंद्रशेखर देशमुख, चंदा देशमुख , प्रा. प्रभाकर पाटील , राजेश्वर पेठकर, दामोदर नुपे , मीरा देशपांडे , ज्योती सुलताने, मीरा वानखड़े ,रविंद्र वानखडे , संजय बुटोले, माया बुटोले , चेतना आनंदानी , अपर्णा काळे, रितू बैस,अमर शर्मा , सचिन मोडक , अविनाश खुंटे , अंबादास तल्हार,सीए तुषार तल्हार यांनी परिश्रम घेतले.

# तालुक्याला वंचित ठेवत बाळापूरकडे पाइपलाइनद्वारे पाणी

विशाल नांदोकार २५ जानेवारी

## ◆ प्रशासन व आमदारांवर गंभीर आरोप

**तेल्हारा:** तेल्हारा तालुक्यातील अनेक गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई असताना वान धरणाचे पाणी पाइपलाइनद्वारे बाळापूरकडे वळवण्याच्या हालचाली सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. सध्या प्रत्यक्षात बाळापूरला पाणीपुरवठा सुरू नसला, तरी जलशुद्धीकरण केंद्राचे बांधकाम व पाइपलाइनचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र, याउलट तेल्हारा तालुक्यातील उर्वरित तसेच मंजूर गावांना पाणीपुरवठा सुरू होण्याचे साधे संकेतसुद्धा प्रशासनाकडून दिसून येत नाहीत.

तेल्हारा तालुक्यात अनेक गावांमध्ये पाण्याच्या टाक्यांची कामे अर्धवट अवस्थेत असून, काही ठिकाणी गावांतर्गत पाइपलाइन टाकण्यात आली आहे. असे असतानाही वान धरणाचे पाणी गावांपर्यंत पोहोचवण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा उभारण्यात प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरत असल्याचा आरोप



स्थानिक नागरिक करत आहेत. दरम्यान, यापूर्वीही वारी भैरवगड येथे नियमबाह्य व बेकायदेशीर जलशुद्धीकरण प्रकल्पाचे बांधकाम सुरू असल्याचा प्रकार उघडकीस आला होता. सदर प्रकरणात ग्रामपंचायतीची परवानगी नसताना, तसेच कोणतेही अधिकृत हरकत प्रमाणपत्र न घेता काम सुरू असल्याचे निदर्शनास आले होते. विशेष म्हणजे, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने ४ मार्च २०२३ रोजी या प्रकल्पाला स्पष्ट स्थगिती दिली असतानाही काम सुरू ठेवण्यात आल्याचा आरोप शेतकरी व स्थानिक नागरिकांनी केला होता.

या पार्श्वभूमीवर पाहता, पाणीपुरवठा योजनांबाबत प्रशासन नियमांना बगल देत काम करत असल्याचा संशय अधिक बळावतो. एकीकडे तेल्हारा तालुक्यातील शेतकरी व नागरिक पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकत असताना, दुसरीकडे बाळापूरसाठी मात्र जलशुद्धीकरण इमारती व पाइपलाइनची कामे वेगाने मार्गी लावली जात असल्याने तेल्हारा तालुक्याला जाणीवपूर्वक दुर्लक्षित केले जात आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे. या संपूर्ण परिस्थितीवरून स्थानिक आमदार भारसाकळे यांनी तेल्हारा तालुक्याकडे जाणीवपूर्वक पाठ फिरवली असल्याचा आरोप नागरिकांकडून होत असून, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

पाणी उपलब्ध असूनही ते टंचाईग्रस्त गावांपर्यंत न पोहोचणे, अर्धवट पाणीपुरवठा योजना, पूर्वीचे नियमबाह्य प्रकल्प आणि प्राधान्यक्रमातील भेदभाव यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी तसेच तेल्हारा तालुक्यातील सर्व मंजूर गावांना तातडीने वान धरणाचे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

> आमच्या गावात पाण्याच्या टाक्या उभ्या आहेत, पण त्या कोरड्याच आहेत. सध्या स्थितीत गावाला पाणीपुरवठा हा बोअरवेलद्वारे करण्यात येतो मात्र या पाण्यामध्ये क्षाराचे प्रमाण जास्त असल्यामुळे किडनीच्या आजारांमध्ये वाढ होत आहे. वारीच्या पाण्याकरिता पाइपलाइन टाकून वर्षे झाली, तरी धरणात पाणी असूनही आमच्या नशिबी एक थेंब नाही. हे आमचं दुर्दैव नाही, तर प्रशासनाचं अपयश आहे.
>
> **सुनील रमेश ताथोड**
> नागरिक, तळेगाव (डवला)

> या प्रकल्पासंदर्भात सिंचन मंडळाकडे माहिती अधिकारांतर्गत (ऊघ्) मागितलेली माहितीही उपलब्ध करून दिली जात नसल्याने पारदर्शकतेबाबत शंका निर्माण होत आहे. लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी अधिकृत भूमिका स्पष्ट करणे ही आवश्यक आहे. तेल्हारा तालुक्यातील मंजूर गावांना पाणी नसताना बाळापूरसाठी प्रकल्पाला प्राधान्य देण्यामागे नेमका कोणाचा हितसंबंध आहे, हा प्रश्न उपस्थित होतो. प्रशासनाने तात्काळ काम थांबवून संपूर्ण प्रकरणाची पारदर्शक चौकशी करावी आणि स्थानिक शेतकऱ्यांना विश्वासात घ्यावे.
>
> **रजनीश पोटे**

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. २५ जानेवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# गोवंश तस्करी; ट्रक जप्त, तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी २५ जानेवारी



**पांढरकवडा :** पांढरकवडा पोलीस स्टेशनच्या सतर्कतेमुळे गोवंश तस्करीचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, या कारवाईत १९ बैल व एक ट्रक जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी तिघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. २३ रोजी सकाळी सुमारे ७.०६ वाजताच्या सुमारास पांढरकवडा–पाटणबोरी राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ वर नियमित पेट्रोलिंग सुरू असताना पोलीस कर्मचारी राम राठोड व गजानन पत्रे यांना गोपनीय माहिती मिळाली. नागपूरहून ट्रकद्वारे गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी अदिलाबादकडे नेली जात असल्याची माहिती प्राप्त होताच पोलिसांनी तत्काळ कारवाईचे नियोजन केले. दोन पंचांना बोलावून पाटणबोरी येथील माहुली धाब्याजवळ सापळा रचण्यात आला. अतिरिक्त मदतीसाठी पोलीस उपनिरीक्षक सचिन रघुपती व सरकारी वाहनचालक महेश धामणकर यांनाही घटनास्थळी पाचारण करण्यात आले. दरम्यान, नागपूरकडून येणारा ट्रक क्रमांक MH 31 FC 4861 थांबवून पंचासमक्ष तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ट्रकमध्ये १९ बैल अत्यंत क्रूर व अमानुष पद्धतीने कोंबून वाहतूक केल्याचे आढळून आले. बैलांच्या मानेस आकुड दोरी बांधून पाय घट्ट बांधण्यात आले होते, त्यामुळे जनावरांना तीव्र त्रास होत असल्याचे स्पष्ट दिसून आले.

ट्रक चालकाने आपले नाव सय्यद फारुख सय्यद रशिद (वय ३६, रा. कामठी, नागपूर) असे सांगितले. चौकशीत ही जनावरे शेख मुक्तार शेख मुस्ताक कुरेशी (वय ३६, रा. कामठी, नागपूर) यांच्या मालकीची असल्याचे निष्पन्न झाले. जनावरांच्या वाहतुकीसाठी आवश्यक असलेले कोणतेही परवाने, वैद्यकीय प्रमाणपत्र अथवा कागदपत्रे आरोपींकडे नसल्याचे पंचासमक्ष स्पष्ट झाले. या कारवाईत जप्त करण्यात आलेल्या १९ बैलांची किंमत अंदाजे ३ लाख ७ हजार रुपये, तर ट्रकची किंमत अंदाजे २० लाख रुपये असून, एकूण २३ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

या प्रकरणी चालक सय्यद फारुख सय्यद रशिद, जनावरांचा मालक शेख मुक्तार शेख मुस्ताक कुरेशी तसेच मदतनीस वैभव विनोद उके (वय ३१) यांच्याविरुद्ध अप. क्र. ६५/२६ अन्वये महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ (सुधारित १९९५), प्राणी क्रूरता प्रतिबंधक अधिनियम १९६० व मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक लहु तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल गजानन पत्रे करीत आहे.

# अरुणावती नदीपुलावरील कठडे बसविण्याचे काम सुरु

## परवेज बेग यांच्या निवेदनाची दखल

प्रतिनिधी २५ जानेवारी



**आर्णी :** येथील अरुणावती नदीपुलावरील लोखंडी कठडे बसविण्याच्या कामास अखेर सुरुवात झाली असून, सामाजिक कार्यकर्ते परवेज बेग मिर्झा यांनी केलेल्या निवेदनाची दखल सार्वजनिक बांधकाम उपविभाग, आर्णी यांनी घेतल्याने नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे.

मागील काही काळापूर्वी अरुणावती नदीला आलेल्या पुरामुळे नदीपुलावरील लोखंडी कठडे वाहून गेले होते. त्यानंतर बराच काळ या गंभीर बाबीकडे सार्वजनिक बांधकाम उपविभागाने दुर्लक्ष केल्याचे दिसून येत होते. कठडे नसल्याने दुचाकीस्वार, वाहनचालक तसेच पादचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता.

या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते परवेज बेग मिर्झा यांनी 19 जानेवारी रोजी उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, आर्णी यांना निवेदन सादर केले होते. येत्या 5 फेब्रुवारीपासून सर्वधर्मीयांचे श्रद्धास्थान असलेल्या बाबा कंबलपोष उर्स यात्रेला प्रारंभ होत असून, या काळात पुलावरून मोठ्या प्रमाणात भाविकांची तसेच वाहनांची वर्दळ राहणार आहे. पुलावर सुरक्षा कठडे नसल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता लक्षात घेता, लोखंडी कठडे तात्काळ बसविण्याची मागणी त्यांनी केली होती.

या निवेदनाची दखल घेत सार्वजनिक बांधकाम उपविभाग, आर्णी यांनी अरुणावती नदीपुलावरील लोखंडी कठडे बसविण्याच्या कामास सुरुवात केली आहे. त्यामुळे नागरिकांत समाधान व्यक्त होत असून, वेळेत पाठपुरावा केल्याबद्दल परवेज बेग मिर्झा यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# प्रवाशी महिलेचे मंगळसूत्र लंपास

प्रतिनिधी २५ जानेवारी

**कळंब :** प्रवासादरम्यान दागिन्यांची चोरी होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असून कळंब बस स्थानकावर एक चोरीची घटना घडली आहे. फिर्यादी सौ. शालू अरुण सुपारे रा. जवळा या जवळा येथून यवतमाळमार्गे कळंबला जात होत्या. तेथून ईजाळा येथे जाण्यासाठी बसने प्रवास करत असताना, अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्समधील मंगळसूत्र लंपास केले. यामध्ये ५ ग्रॅमचे पेंडंट आणि ८ ग्रॅमचे मणी असलेले सुमारे १.५ तोळ्याचे मंगळसूत्र ३५,००० चोरीला गेले आहे. याप्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला.

# ‘सुर झंकार’ कराओके संगीत कार्यक्रम

प्रतिनिधी २५ जानेवारी

**पांढरकवडा :** ७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रेस क्लब पांढरकवडा व आदिवासी समाज मित्रपरिवार, पांढरकवडा यांच्या संयुक्त विद्यमाने ‘सुर झंकार’ या कराओके संगीत कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. देशभक्तीपर गीतांपासून भावगीत, भक्तिगीते, भीमगीते तसेच सदाबहार हिंदी-मराठी चित्रपट गीतांचे सादरीकरण या कार्यक्रमात करण्यात येणार असून, संगीतप्रेमींसाठी ही एक खास पर्वणी ठरणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन उपविभागीय पोलीस अधिकारी पांढरकवडा, रॉबिन बन्सल (IPS) यांच्या शुभहस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरपरिषद पांढरकवड्याचे नगराध्यक्ष अतिश उर्फ सोनू भैय्या बोरले हे राहणार आहेत.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शंतनु लता श्रीकांत दुधाडे, उपजिल्हा रुग्णालय पांढरकवड्याच्या वैद्यकीय अधीक्षक वैशालीताई सातुरवार तसेच पोलीस स्टेशन पांढरकवड्याचे पोलीस निरीक्षक लहुजी तावरे उपस्थित राहणार आहेत.

हा कार्यक्रम सोमवार, २६ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता पांढरकवडा येथील नगरपरिषद बचत भवन सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाचे आयोजन प्रेस क्लब पांढरकवडा यांच्या वतीने करण्यात आले आहे. प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रवीण पिन्नमवार, उपाध्यक्ष सफी खान, सचिव रवी वल्लमवार, कोषाध्यक्ष योगेश मडावी असून सल्लागार म्हणून संभा मडावी, अशफाक खान, संतोष मग्गिडवार, तनवीर शेख, गणेश सामजवार व वाजित कुरेशी कार्यरत आहेत.


आदिवासी समाज मित्रपरिवार पांढरकवड्याकडून अध्यक्ष रघुनाथ श्रीराम, उपाध्यक्ष जीवन मेश्राम, सचिव सुनील आडे तर सदस्य म्हणून सुरेश मुडाले, सुधीर मडावी, विवेक कोडापे व विष्णू सिडाम हे संयोजनात सहभागी आहेत.

# उमरखेड आर्य वैश्य समाजाची नविन पंचवार्षिक कार्यकारणी जाहीर

## अध्यक्षपदी राजेश्वर रायेवार तर उपाध्यक्षपदी विवेक कन्नावार

प्रतिनिधी २५ जानेवारी





**उमरखेड :** आर्य वैश्य समाजाची उमरखेड तालुकास्तरीय पंचवार्षिक कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

यामध्ये अध्यक्षपदी ज्येष्ठविधीज्ञ ॲड. राजेश्वर रायेवार यांची अध्यक्षपदी तर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विवेक कन्नावार यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. आर्य वैश्य समाज कार्यालयात सुरेंद्र कोडगिरवार यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ गजानन कोडगीरवार यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या नवीन कार्यकारणी निवडीच्या बैठकीत सर्वानुमते नवीन कार्यकारणी ची निवड करण्यात आली. सदर कार्यकारणी पुढील पाच वर्ष कारभार पाहणार आहे. नवनियुक्त कार्यकारणीत अध्यक्षपदी ॲड. राजेश्वर रायेवार, उपाध्यक्षपदी विवेक कन्नावार, सचिवपदी उदय पत्तेवार, सहसचिवपदी सचिन डुबेवार, कोषाध्यक्षपदी वैभव कोडगीरवार, सहकोषाध्यक्षपदी रत्नाकर कवटीकवार व हिशोब तपासणीसपदी डॉ.अनिल गंधेवार यांची निवड करण्यात आली आहे. सदर निवड झाल्यानंतर जुन्या कार्यकारिणीने व समाज बांधवांनी नवीन कार्यकारणीचे पुष्पहार घालून स्वागत केले. यावेळी उमरखेड तालुक्यातील सर्व समाज बांधव उपस्थित होते.

# भरधाव वाहनाच्या धडकेत वृध्द जखमी

प्रतिनिधी २५ जानेवारी

**यवतमाळ :** शहरातील तहसील चौक ते जाजू चौक दरम्यान एका भीषण अपघाताची नोंद झाली आहे. २३ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास फिर्यादी दीपक निमसरकार रा. सिद्धेश्वर नगर हे आपल्या दुचाकीने (क्र. एम.एच. २९ वाय ६३३७) भाजीपाला घेण्यासाठी जात होते. दरम्यान, पाठीमागून येणाऱ्या वाहन क्र. एम.एच.०१ सी.आर ०६६८ च्या चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून फिर्यादीच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या अपघातात निमसरकार गंभीर जखमी झाले आहेत. अवधूतवाडी पोलिसांनी २३ जानेवारीला अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# पांदण रस्त्यासाठी आमरण उपोषण

प्रतिनिधी २५ जानेवारी



**पुसद :** फुलवाडी गावातील ग्रामस्थांनी 23 जानेवारी 2025 पासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर पनशिरा शेत पांदण रस्त्यासाठी आमरण उपोषण सुरू केले आहे.

गावातील देवठाणा शिवारामध्ये अनेक शेतकऱ्यांची शेती असून तिथे जाण्यासाठी ठोस रस्त्याची सोय नाही. त्यामुळे शेतकरी, शेतमजूर आणि जनावरांना ये-जा करणे कठीण झाले आहे. पावसाळ्यात शेतातील माल घरी आणणे आणि बी-बियाणे, खते शेतात नेणे विशेषतः अवघड ठरत आहे. रस्त्याअभावी सोयाबीनसारखी पिके जंगली जनावरांकडून नाश होण्याची धोकादेखील आहे.

ग्रामस्थांनी 8 जानेवारी 2025 रोजी तहसीलदार पुसद, पोलीस स्टेशन खंडाळा आणि संबंधित विभागांना निवेदन दिले होते. या मागण्यांबाबत शासनाकडे आधीही अनेकदा निवेदन दिले गेले, परंतु अजूनही यावर योग्य प्रतिसाद मिळालेला नाही.

ग्रामस्थांनी आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारून तातडीने रस्ता तयार करण्याची मागणी केली असून, तहसीलदार पुसद व संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरीत लक्ष देऊन योग्य तो निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# गणपती जन्मोत्सवानिमित्त भागवत कथा ज्ञानयज्ञ



प्रतिनिधी २५ जानेवारी

**पारवा :** पारवा ग्रामवासी यांच्या वतीने श्री अकरा वरचा गणपती जन्मोत्सवाच्या निमित्ताने मंगळवार, दि. २० ते ३० जानेवारी दरम्यान श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या ज्ञानयज्ञात परमश्रद्धेय भागवत भूषण ह.भ.प. श्रीकृष्ण कुमार पांडेय महाराज (काशी, उत्तर प्रदेश) यांच्या मधुर वाणीतून श्रीमद् भागवत कथा कथन होणार आहे. तसेच वेदाचार्य कामेश्वर तिवारी जी व अजय पांडे जी यांच्या वतीने शिवपुराण कथा पार पडणार आहे. या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी पारवा व परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पारवा येथील ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार असून, त्यासाठी अनेक अन्नदात्यांनी स्वयंस्फूर्तपणे मदतीचा हात पुढे केला असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली आहे.

# कंत्राटी ग्रामसेवकाची गळफास लावून आत्महत्या

प्रतिनिधी २५ जानेवारी



**कळंब :** तालुक्यातील शेळी ग्रामपंचायत मध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी ग्रामसेवकाने गळफास लावून आत्महत्या केली. ही खळबळ जनक घटना आज शनिवारी सकाळी घडली.

प्रतीक संतोष इंगळे वय २६ रा. मूळ रहिवासी चांदूरबाजार असे आत्महत्या केलेल्या ग्रामसेवकाचे नाव आहे. शेळी ग्रामपंचायतीत कंत्राटी ग्रामसेवक म्हणून कार्यरत होते. दिनांक २४ जानेवारी रोजी सकाळी अंबिका नगर येथील आपल्या किरायाच्या घरात आडव्याला दोर बांधून गळफास लावून आत्महत्या केली. प्रतीक इंगळे अविवाहित असून, सुमित किन्नाके यांच्या घरी किरायाने राहत होता. घटनेची माहिती मिळताच कळंब पोलिस ठाणेदार राजेश राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पथक घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदन करण्यात आले. या घटनेने खळबळ उडाली आहे. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. पुढील तपास ठाणेदार राजेश राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# महादीप परीक्षेत यश भोयर यशस्वी, विमानवारीची संधी

प्रतिनिधी २५ जानेवारी



**झरी जामणी :** तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच स्पर्धा परीक्षांची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने यवतमाळ जिल्हा परिषदेच्या वतीने घेण्यात येणारी अभ्यासक्रम व सामान्य ज्ञानावर आधारित महादीप परीक्षा खातेरा गावासाठी अभिमानास्पद ठरली आहे. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, खातेरा येथील इयत्ता पाचवीतील विद्यार्थी यश नारायण भोयर याने जिल्हास्तरीय महादीप परीक्षेत यश संपादन करत जिल्हा परिषदेमार्फत होणाऱ्या विमानवारीसाठी पात्रता मिळवली आहे.

खातेरा शाळेतील पाच विद्यार्थ्यांनी ही जिल्हास्तरीय परीक्षा दिली होती. त्यामधून यश भोयर याची निवड झाल्याने झरी जामणी तालुक्याला महादीप परीक्षेत प्रथमच हे मानाचे यश मिळाले आहे. या यशामुळे शाळेसह संपूर्ण खातेरा गावात आनंदाचे वातावरण पसरले असून, गावाच्या शैक्षणिक वाटचालीत नवा अध्याय जोडला गेला आहे.

यश भोयरच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल गटविकास अधिकारी रविंद्रकुमार सांगळे, गटशिक्षणाधिकारी निलेश खैरनार, विस्तार अधिकारी मोहन काटकर, केंद्रप्रमुख माधव उदार यांच्यासह विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यशच्या यशामुळे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, खातेरा यांचा गौरव वाढला असून शिक्षकांच्या मेहनतीचे फळ मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे, मागील वर्षीही शाळेतील आठ विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय परीक्षा दिली होती; मात्र थोडक्यात गुणांअभावी विमानवारीची संधी हुकली होती. यावर्षी मात्र यश भोयर याने मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर यश मिळवत शाळेचे, गावाचे व तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

या यशामागे शाळेचे मुख्याध्यापक राजेश अक्केवार, विषय शिक्षक जगदीश आरमुरवार, कडू सर तसेच स्वयंसेवक संगीता कुळसंगे व मेघा लसने यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. शाळा प्रशासन व शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने यश भोयरचे अभिनंदन करण्यात आले असून, भविष्यात त्याच्याकडून आणखी उज्ज्वल यशाची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# आर्णी येथे फूड फेस्टिव्हल उत्साहात

प्रतिनिधी २५ जानेवारी



**आर्णी :** येथील बाबा कम्बलपोष उर्दू हायस्कूल व आयडियल पब्लिक स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आज फूड फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

या फेस्टिव्हलचे उद्घाटन आयडियल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सैयद मक्सूद अली पटेल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेवक सैयद रियाज, जावेद सोलंकी, समद पहेलवान, पत्रकार नौशाद अली, नईम फानन, हाफीज उमेर, इरफान पटेल आदी मान्यवर उपस्थित होते.

फेस्टिव्हलमध्ये केजी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स लावले होते. केजी-१चा विद्यार्थी अरमान शेख याने ब्रेड पकोडा, वर्ग पहिलीतील उक्बा हाफीज उमेर याने दही वडा, फातेमा सैयद हिने पास्ता व मोमोज, ताहेरा शेख हिने डोसा, जिनत शेख हिने पोटॅटो ट्विस्टर, तर शाहिद शेख याने पाणीपुरीचा स्टॉल लावला होता.

दहावीतील कु लायबा शेख हिने आलू समोसा व अंडा पकोडा, तसेच पुरी-भाजी, भेळ, खस्ता, कच्चा चिवडा, दहिपुरी, विविध प्रकारचे आईस्क्रीम, बदाम शेक, खिचडा आदी पदार्थांचे स्टॉल्सही आकर्षण ठरले.

प्रमुख पाहुणे, शिक्षक व पालकांनी स्टॉल्सना भेट देत विविध पदार्थांचा आस्वाद घेतला. यावेळी विद्यार्थ्यांनी मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर केले. तसेच सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नोत्तरे घेण्यात आली. अचूक उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी फिरदौस शाहीन सैयद, खालिद शेख, फौजिया आफरीन सैयद, नौशाद अली, अजीज चौव्हाण, मुजीब शेख, सोहेल खान, अकरम बेग तसेच आयडियल पब्लिक शाळेच्या मुमताज बेग, अर्शिया शेख, रुखसार शेख, सानिया सैयद, शहेजीन शेख आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जि. प. शाळेत शाळा व्यवस्थापन समितीची बैठक

प्रतिनिधी २५ जानेवारी

**योगेश मडावी**



**झरी जामणी :** झरी जामणी तालुक्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उच्च प्राथमिक जिल्हा परिषद शाळा, माथार्जुन येथे नवनियुक्त शाळा व्यवस्थापन समितीची बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. ही बैठक शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा वृंदा ताई धर्मा गेडाम, मुख्याध्यापक नितीन टिंगणे, शिक्षकवृंद तसेच समिती सदस्यांच्या उपस्थितीत झाली.

या बैठकीस प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत माथार्जुनचे सरपंच रविंद्र कायतावर व ग्रामपंचायत सदस्य बाबुलाल किनाके उपस्थित होते.

यावेळी नवनियुक्त शाळा व्यवस्थापन समिती जाहीर करण्यात आली. त्यामध्ये अध्यक्षपदी सुधाकर आत्राम, उपाध्यक्षपदी श्रीमती ज्योत्स्ना वड्डे यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून प्रवीण गेडाम, विकेश मडावी, वर्षा मेश्राम, सपना बावणे, गणेश कोडापे, करिश्मा पेंदोर, मोहन सिडाम, मंजुषा मडावी, दयानंद पेंदोर यांची नियुक्ती करण्यात आली असून, शिक्षणप्रेमी सदस्य म्हणून भारत कोटनाके यांची निवड करण्यात आली. मार्गदर्शन करताना सरपंच रविंद्र कायतावर यांनी सांगितले की, शाळा व्यवस्थापन समितीने शाळेवर योग्य नियंत्रण ठेवून दरमहा होणाऱ्या बैठकींना उपस्थित राहावे. शाळेतील शैक्षणिक अडचणी समजून घेऊन त्यावर सकारात्मक निर्णय घ्यावेत, जेणेकरून विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडविता येईल. यावेळी शिक्षणप्रेमी योगेश मडावी यांनी आपली भूमिका मांडताना सांगितले की, “खाजगीकरणाच्या युगातही पालकांनी आपल्या पाल्यांना जिल्हा परिषद शाळेतच प्रवेश द्यावा, हे माझे स्वप्न आहे.

शाळा गुणवत्तेच्या बाबतीत कॉन्व्हेंट शाळांप्रमाणे सक्षम व्हावी, विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी व बौद्धिक गुणवत्ता निर्माण व्हावी, अशी माझी अपेक्षा आहे. काही अपूर्ण स्वप्ने नवनियुक्त समिती नक्कीच पूर्ण करेल, असा विश्वास आहे.” कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन चव्हाण यांनी केले. तर आभार प्रदर्शन दत्तात्रय देवलवार यांनी मानले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार दि. २५ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालयात जिल्हास्तरीय कर्तव्य बोध दिवस कार्यक्रम

**वाशीम :** अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ, वाशिम जिल्हा व मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय कर्तव्य बोध दिवस या कार्यक्रमाचे आयोजन शनिवार दि.२४ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले होते. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.एस.कुबडे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशिम चे अध्यक्ष डॉ.नारायणराव गोटे,प.दि.जैन महाविद्यालय अनसिंग येथील इतिहास विभाग प्रमुख व अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ अमरावती विभागाचे उपाध्यक्ष डॉ .सचितानंद बिचेवार, राजस्थान महाविद्यालय वाशिम येथील प्रा. डॉ. राजेश रिसोडकर तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. बी.आर. तनपुरे हे उपस्थित होते.




# कर्तव्यातील कसूर भोवणार, कारवाई निश्चित होणार !

## कृषी विभागातील 'दोषीं' कर्मचाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार कायम

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

सन २०२३-२४ मधील दुष्काळी निधी वाटपात झालेल्या भ्रष्टाचारापासून जिल्ह्यात अनेक घोटाळे चव्हाट्यावर येत आहेत. पोकरा भाग एक या योजनेतील गैरप्रकाराने तर वाशिम जिल्हा संपूर्ण राज्यात गाजत आहे. त्यातच कर्तव्यात कसूर करत अनेक शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या कृषी विभागतील १६ ते १८ कर्मचारी दोषीं ठरले आहेत. त्या सर्व दोषींवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. मात्र आर्थिक देवाण - घेवाण करून दोषीं कर्मचाऱ्यांची पाठराखण केली जात असल्यचा संशय व्यक्त केला जात आहे. परंतु कितीही पाठराखण केली तरी कर्तव्यातील कसूर अखेर भोवणार आणि कारवाई निश्चितच होणार ! अशी विश्वसनीय माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर दिली आहे. परिणामी 'त्या' सर्व दोषीं कर्मचाऱ्यांवरील निलंबनाची टांगती तलवार कायम असल्याची माहिती समोर येत आहे.






नैसर्गिक संकटाचा सामना करता करता राज्यातील शेतकरी मेटाकुटीस आला आहे. तर काही भागात सातत्याने गारपीट, अतिवृष्टी तर कधी कोरडा दुष्काळ तर कधी हातात आलेले उभी पिके महापुरात वाहून गेली आहेत.परिणामी उत्पन्नाऐवजी शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. आर्थिक संकटात सापडलेल्या अनेक अन्नदात्यांनी गळफास आवळून आपली जीवनयात्रा संपवली आहे. यात वाशिम जिल्हा अग्रस्थानी असून एक आकांक्षित जिल्हा म्हणून घोषित आहे. त्यामुळे केंद्र शासन असो अथवा राज्य शासनाच्या कृषी विषयक विविध योजनेत वाशिम जिल्ह्याचा प्राधान्याने समावेश करण्यात येतो. जेणेकरून जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या हतबल झालेल्या शेतकऱ्यांना योजनांचा लाभ देऊन शाश्वत उत्पन्नाची हमी मिळेल. या स्तुत्य हेतूने कृषी विभागांतर्गत अनेक योजना राबविण्यात येत आहेत. त्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा योजना ही खुप महत्वाकांक्षी योजना आहे. या योजनेचा पहिला टप्पा सन २०२५ मध्ये संपुष्टात आला असून सन २०२६ दुसरा टप्पा सुरू झाला आहे. मात्र पहिल्या टप्प्यात कृषी विभागाच्या काही कमिशनखोर अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी या महत्वाकांक्षी योजनेची वाट लावली आहे. त्यात काही दलाल शेतकऱ्यांनी हातभार लावत योजनेचा बट्ट्याबोळ केला आहे. ठराविक काही टक्के कमिशन मिळत असल्याने गावपातळीवरील कर्मचाऱ्यांनी आर्थिक लोभापायी एकाच कुटुंबात वेगवेगळ्या नावांवर लाखों रुपयांचे अनुदान वितरित केले आहे.

तर काही अडाणी शेतकऱ्यांच्या अज्ञानपणाचा फायदा घेत बोगस अनुदान हडपले आहे. तर काही ठिकाणी सामूहिक लाभाच्या घटकात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाले आहेत. परिणामी शासनाच्या स्तुत्य हेतुला 'खो' देत भ्रष्ट व्यवस्थेने शेतकऱ्यांच्या नावावर स्वतःच्या आर्थिक तुंबड्या भरून घेतल्या आहेत. या बाबत अनेक तक्रारी समोर येत असून काही तक्रारी थेट वरिष्ठ स्तरांवर करण्यात आल्या आहेत.

वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या शेलुखडसे येथील पोकरा योजनेची तक्रार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत पोहचली आहे. या गंभीर प्रकाराची चौकशी करण्यासाठी तपास अधिकारी नेमून प्राथमिक तपासणी पार पडली आहे. मात्र यात कारवाई काय झाली ? हा प्रश्न अद्यापही गुलदस्त्यातच आहे.

वरिष्ठांकडे अहवाल पाठविला असल्याची माहिती सबंधित तपास अधिकारी यांच्याकडून मिळत आहे. परंतु पुढील कारवाई किती दिवसाच्या कालावधीत होणार याची माहिती अद्यापही स्पष्ट झालेली नाही. त्यातच कामातील दिरंगाई, भ्रष्टाचार आणि गैरप्रकरणी कृषी विभागाच्या अनेक कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई झालेली आहे. परंतु सदर कारवाई प्रलंबित असल्याने भ्रष्ट कर्मचारी चांगलेच शेफारले आहेत. आमचे कोणीही काहीही वाकडे करू शकत नाही! या आविर्भावात 'ये रे माझ्या मागल्या' या म्हणी प्रमाणे सदर दोषी कर्मचाऱ्यांचा स्वैराचार सुरूच आहे. ही बाब पुढील शासकीय योजना राबविण्यासाठी धोकादायक ठरणारी आहे.

या गंभीर प्रकाराची वरिष्ठांकडून तातडीने दखल घेत दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सर्व सामान्य नागरिक करीत आहेत.




## थोडक्यात

### पिंप्री अवगण येथे मातृपितृ पुजनाचा कार्यक्रम

•सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर•

परमहंस झोलेबाबा विद्यालय येथे योग वेदांत बालसंस्कार सेवा समिती मंगरुळनाथच्या वतीने मातृपितृ पूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला.हा कार्यक्रम शाळेसाठी



आगळा वेगळा ठरला.कारण पालकांच्या अविस्मरणीय कार्याचे स्मरण व मुलांच्या हाताने पालक तथा गुरुजनांचे पूजन हा अनोखा कार्यक्रम हृदयाला स्पर्श करून गेला.या कार्यक्रमाचे औचित्य साधून योगवेदांत बालसंस्कार समितीच्या कार्यकर्त्यांनी सखोल मार्गदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या काळजाचा ठाव घेतला.यावेळी मार्गदर्शन करताना श्री.सावके सर यांनी 'स्वस्थ,सुखी व सन्मानित जीवन'असे जिवण जगण्यासाठी कशा प्रकारची जीवनपद्धती आचरण करावी व जीवनामध्ये आई-वडिलांचे अनन्यसाधारण महत्त्व यावेळेस विशद केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्रा.सुनिलजी सपकाळ हे होते.त्यांनी सुद्धा भूतकाळातील आईवडिलांच्या आठवणी आणि प्रेरणादायी विचारांचे,स्मरण केले व आपल्या जीवनाला आई-वडिलांनी कसा आकार दिला ह्या बद्दल विषय मांडून श्रोत्यांना भावुक केले.यावेळी पालक प्रतिनिधी मुख्य संपादक दिलीपभाऊ अवगण,तसेच पालक समिती अध्यक्ष श्री दिलीपजी महादेवराव अवगण यांनी सुद्धा आपले विचार व्यक्त करताना आजच्या काळात आपापल्या आई-वडिलांविषयी कृतज्ञता भाव जपण्याची गरज प्रतिपादन केली. व त्याचप्रमाणे दरवर्षी असा संस्कार करणारा कार्यक्रम घेण्याबाबत संस्थेचे आभार मानले.

त्याचप्रमाणे उपस्थित ह.भ.प.राघोजी अवगण सर यांनी सुद्धा मार्गदर्शनपर भाषण केले. श्री.सचिन बेंद्रे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री.राठोड सर यांनी केले. यावेळी योग वेदांत सेवा समितीचे कार्यकर्ते तसेच सर्व शिक्षक,तथा शिक्षकेतर कर्मचारी आवर्जून उपस्थित होते.

### उद्या पालकमंत्री ना.दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते ध्वजवंदन

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•



भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सोमवार, दि. २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९.१५ वाजता वाशिम येथील पोलीस कवायत मैदानावर मुख्य शासकीय राष्ट्रध्वज वंदन समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.या समारंभात राज्याचे कृषिमंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन होणार आहे.या मुख्य शासकीय कार्यक्रमास सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## आंदोलनातून मिळेना न्याय, दिव्यांगावर १८ वर्षापासून अन्याय...

# सहनशिलतेचा संपला अंत, अधिकाऱ्यांना नाही खंत, उद्या नाही राहायचे जीवंत !






•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

रिसोड तालुक्यातील ग्राम अंचळ येथील दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखडे यांची शेतजमीन अधिकाऱ्यांनी कागदोपत्री चोरली आहे. ती परत मिळविण्यासाठी गेल्या १८ वर्षापासून लोकशाही व्यवस्थेनुसार प्रशासनाशी लढत आहेत. निवेदन, आंदोलन, उपोषण करून न्याय मिळत नसल्याने दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखेडे यांच्या सहनशिलतेचा अंत संपला आहे. मात्र भ्रष्ट अधिकाऱ्यांना याची खंत नाही. त्यामुळे जीवंतच राहायचे नाही असे त्यांनी ठरविले आहे. ते २६ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करणार आहेत. अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे शासकीय धोरणामुळे दिव्यांग शेतकऱ्याला विनाकारण त्रास होवून मरण यातना भोगाव्या लागत आहे.

दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखेडे यांची शेती १८ वर्षापूर्वी तलाठी मंडळ अधिकारी तहसीलदार व काही गावातील प्रतिष्ठांनी संगणमत करून कागदोपत्री चोरली. या सर्वांचे पुरावे असूनही न्याय न मिळाल्याने निवेदन ,आंदोलन , उपोषण दरवर्षी दरदिवशी दिव्यांग शेतकरी लढा देत आहेत. गेल्या वर्षीही दिवाळीला त्यांनी पोस्टरव्दारे त्यांनी 'आमची सहनशिलता संपली, उखाळ्या, पाखाळ्या, कुरघोड्या बंद करा, शेतकऱ्यांना भिक नको कुत्रे आवरा, रक्षकच झाले भक्षक, जिल्हयातील भ्रष्टाचारी प्रशासनाचा नंगानाच बंद करा' अशी वाक्ये लिहून पोस्टर प्रदर्शनातून आंदोलन केले होते. यासोबतच 'न्याय देता का कधी भेटु?' असा सवालही या पोस्टरव्दारे बाबुराव वानखडे प्रशासनाला विचारला होता. यासंदर्भात त्यांनी याआधी वेळोवेळी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, रिसोड तालुक्यातील ग्राम अंचळ येथे ५४/२ हा गट क्रमांक अस्तित्वातच नाही. मात्र शासकीय रेकॉर्डमध्ये अस्तित्वातच नसलेल्या गट क्रमांकाची तहसिल प्रशासन आणि पटवारी ससाने, ज्ञानेश्वर पवार, आर. आर. बोरकर यासह सर्वसंबंधीतांनी संगनमताने निर्मिती करुन त्याव्दारे शासनाची मोठी फसवणूक करण्यात आली आहे.

या प्रकरणातील मौजे अंचळ येथील मुख्य सुत्रधाराला अटक करण्यात यावी. तसेच आपण शासकीय कागदपत्रानुसार गट क्रमांक दाखविणाऱ्यास १० लाख रुपयाचे रोख बक्षीस देवू अशी घोषणाहर दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखेडे यांनी केली आहे. या प्रकरणी माझी जमीन मला परत मिळण्यासाठी मी गेल्या बारा वर्षापासून तहसिलदार, जिल्हा भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, पालकमंत्री, खासदार, आमदार, मुख्यमंत्री आदींना असंख्य वेळा निवेदने दिली आहेत. मात्र माझ्या निवेदनाला प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कचऱ्याची टोपली दाखविली व मला न्याय मिळाला नाही. यासदंर्भात केलेल्या उपोषणात केवळ कोरडी आश्वासने देण्यात आली. तरी सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन मुख्य सुत्रधारांना अटक करण्यात यावी अशी मागणी दिव्यांग शेतकरी वानखेडे यांनी केली आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी व्हावी व प्रशासनाने शासनाच्या लेखी असलेला बोगस ५४/२ हा गट नंबर दाखवून द्यावा. गट नंबर दाखवून देणाऱ्याला आपण ताबडतोब १० लाख रुपयाचे बक्षीस देवू असे आवाहन वानखेडे यांनी प्रशासनाला केले आहे. त्यामुळे आता २६ जानेवारी रोजी पुन्हा आत्मदहन करणार असल्याचा इशाराही त्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.




## व्यसनमुक्त समाजासाठी...

# रिसोड येथे विठाई संस्थेचा पुढाकार!

### *मुख्याधिकाऱ्यांच्या हस्ते जनजागृती मोहिमेचा श्रीगणेशा *व्यसनमुक्तीचा जागर; रिसोड शहरात विशेष प्रचार मोहिमेला सुरुवात

•सिटी न्युज ब्युरो @ रिसोड•

व्यसनाच्या विळख्यात अडकलेली तरुण पिढी वाचवण्यासाठी आणि निरोगी समाजाची निर्मिती करण्यासाठी विठाई मायनॉरिटी बहुउद्देशीय संस्थेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. रिसोड नगर परिषदेचे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी सतिष शेवदा यांच्या हस्ते शहरात व्यसनमुक्ती कार्यक्रमाच्या प्रचार व प्रसार मोहिमेचा रीतसर प्रारंभ करण्यात आला. सामाजिक बांधीलकी जपणाऱ्या या उपक्रमातून व्यसनांच्या दुष्परिणामां बाबत जनजागृती केली जाणार असून, या मोहिमेत सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांचाही




मोठा सहभाग लाभला आहे.

या मोहिमेची औपचारिक सुरुवात करताना मुख्याधिकाऱ्यांनी व्यसनमुक्तीचा संदेश दिला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष प्रदीप खंडारे,सदस्य जियाउर खान, मंगेश राजूरकर,यांच्यासह माजी नगरसेवक काजी सर,आतिक भाई व इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान मुख्याधिकाऱ्यांनी उपस्थितांशी संवाद साधला.ते म्हणाले की, 'व्यसन हे केवळ व्यक्तीलाच नाही,तर संपूर्ण कुटुंबाला उद्ध्वस्त करते.त्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी अशा मोहिमांची नितांत गरज आहे.'विठाई मायनॉरिटी संस्थेच्या माध्यमातून शहराच्या विविध भागात पत्रके वाटून,पथनाट्ये आणि भिंतीपत्रकांच्या माध्यमातून व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.प्रदिप खंडारे यांनीही यावेळी तरुण वर्गाला व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. उपस्थित सर्व मान्यवरांनी या उपक्रमाचे स्वागत करत पूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले आहे.

## निकृष्ट रस्त्याची चौकशी करा; अन्यथा रास्तारोको आंदोलन

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

जिल्ह्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत कोट्यवधी रुपये खर्चून तयार करण्यात आलेल्या खंडाळा–आडोळी–जुमडा–टो–वाघोली–अटकळी–गोरेगाव–हिंगोली–कडोळी या महत्त्वाच्या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून या रस्त्याची चौकशी करा अन्यथा रास्ता रोको आंदोलन करणार असल्याचा सामाजिक कार्यकर्ते गजानन बद्रीनाथ इढोळे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

सदर रस्ता हा विदर्भ व मराठवाडा भागाला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग असून, सुमारे १५ ते २० गावांचा मुख्य संपर्क रस्ता आहे. मात्र, रस्ता पूर्ण झाल्यानंतर अवघ्या तीन महिन्यांतच रस्त्यावरील डांबर उखडणे, सिमेंट रस्त्याला खोल तडे जाणे तसेच रस्त्याच्या मध्यभागी मोठमोठे खड्डे पडणे, अशी धक्कादायक परिस्थिती निर्माण झाली



आहे.

या प्रकरणी यापूर्वी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत चौकशीचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, आजपर्यंत कोणतीही ठोस कारवाई किंवा चौकशीचा निष्कर्ष समोर आलेला नसल्याने संपूर्ण प्रकरण 'गुलदस्त्यात' असल्याचा आरोप इढोळे यांनी केला आहे.

तसेच संपूर्ण रस्ता नव्याने व दर्जेदार पद्धतीने पुनर्बांधणी करावी, अशी ठोस मागणी करण्यात आली आहे.याबाबत तातडीने कार्यवाही न झाल्यास रास्ता रोको, धरणे व बेमुदत आंदोलन छेडण्याचा इशाराही गजानन इढोळे यांनी प्रशासनाला दिला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
रविवार, दि. २५ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# ‘ग्लोबल’, ‘इंटरनॅशनल’ नावांचा फुगा फोडणार कोण ?

♦ शिक्षणाधिकारी कार्यालयावर दबाव आहे तरी कोणाचा ♦ राज्य शासनाचे आदेश धाब्यावर; विद्यार्थ्यांची फसवणूक होतांना शिक्षणाधिकारी गप्प का

प्रतिनिधी २५ जानेवारी

**अकोला :** राज्यातील शाळांच्या नावांमध्ये ’ग्लोबल’, ’इंटरनॅशनल’ आणि ’सीबीएसई’ यांसारखे दिशाभूल करणारे शब्द वापरून पालकांची फसवणूक करणाऱ्या शाळांना शिक्षण संचालनालयाने मोठा झटका दिला आहे. राज्य मंडळाशी संलग्न असूनही केवळ नावाचा बडेजाव मिरवणाऱ्या शाळांच्या नावांवर आता कात्री चालवली जाणार आहे. मात्र, राज्य शासनाचे स्पष्ट आदेश असतानाही अकोल्याचे शिक्षणाधिकारी आणि त्यांची यंत्रणा नेमकी कोणाच्या दबावाखाली काम करत आहे ? असा संतप्त सवाल आता पालकांमधून उपस्थित केला जात आहे.

## पालकांची फसवणूक आणि प्रशासकीय अनास्था

अनेक शाळांकडे कोणतीही आंतरराष्ट्रीय संलग्नता नसताना किंवा त्या परदेशातील शाखा नसतानाही केवळ नावापुढे ’इंटरनॅशनल’ किंवा ’ग्लोबल’ असे शब्द जोडून पालकांकडून अवाच्या सवा फी वसूल केली जाते. ’सीबीएसई’ हा शब्द केवळ केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अधिकृत शाळांसाठीच वापरणे बंधनकारक असताना, राज्य मंडळाच्या शाळाही हा शब्द वापरून पालकांची दिशाभूल करत आहेत. शिक्षण संचालनालयाने यासंदर्भात कडक पत्रक काढून हे शब्द वगळण्याचे निर्देश दिले आहेत. तरीही अकोला जिल्ह्यात अशा शाळांचे पेव फुटले असून प्रशासन मात्र सुस्त असल्याचे चित्र आहे.




## काय आहेत शिक्षण संचालनालयाचे निर्देश?

शिक्षण संचालनालयाने स्पष्ट केले आहे की, शाळांच्या नावामध्ये विनाकारण ’इंटरनॅशनल’, ’ग्लोबल’ किंवा ’सीबीएसई’ असे शब्द असल्यास ते तात्काळ काढून टाकावेत. नव्याने मान्यता मागणारे प्रस्ताव तपासताना ही नावे बदलल्याशिवाय मंजुरी देऊ नये. तसेच, ज्या शाळांच्या नावांत आधीपासूनच असे शब्द आहेत, त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे संकेत देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे पालकांची होणारी आर्थिक आणि शैक्षणिक फसवणूक थांबणार असून त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र, स्थानिक पातळीवर शिक्षणाधिकारी यावर कधी आणि कशी कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दोषी शाळांवर कारवाई करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही आता कारवाईची टांगती तलवार असणार आहे.

## शिक्षणाधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद

राज्य मंडळाशी संलग्न शाळा स्वतःला ’ग्लोबल’ म्हणवून घेतात, ज्यामुळे पालकांमध्ये शाळा आंतरराष्ट्रीय दर्जाची असल्याचा चुकीचा समज निर्माण होतो. शिक्षण संचालनालयाने नवीन शाळांना मान्यता देताना आणि जुन्या शाळांच्या नावांची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. मग अकोल्यात अद्याप कारवाई का झाली नाही ?. राज्य शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याऐवजी शिक्षणाधिकारी कार्यालयाने याकडे डोळेझाक केली आहे का? असा प्रश्न विचारला जात असून, ’शिक्षणाधिकाऱ्यांनी शासन निर्णयाची होळी केली आहे काय?’ अशी चर्चा आता शैक्षणिक वर्तुळात रंगू लागली आहे.

# आर.डी.जी. पब्लिक स्कूल मध्ये आनंदोत्सव साजरा

प्रतिनिधी २५ जानेवारी

♦ चविष्ट खाद्य पदार्थांच्या स्टॉल्समुळे रंगत वाढली



**अकोला :** येथील आर.डी.जी.पब्लिक स्कूल मध्ये २२ जानेवारी रोजी संध्याकाळी स्कूलचे संचालक दिलीपराजजी गोयनका, प्राचार्य कुरियचन सी. पी., उपप्राचार्या श्वेता चोमवाल यांच्या मार्गदर्शनात आनंदोत्सवाचे सुंदर आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम आर. डी. जी. पब्लिक स्कूलच्या संस्थापिका स्व. मधु मां यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण व अभिवादन करण्यात आले. वैविध्यपूर्ण अशा कार्यक्रमात विद्यार्थी रममाण झाले होते.

स्कूलचे संचालक दिलीपराजजी गोयनका यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देत त्यांचे मनोबल वाढविले व त्यांच्या या उपक्रमाची प्रशंसा केली. शाळेत दरवर्षी आनंदोत्सवाचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांना खरेदी विक्रीचे व्यवहार समजावे तसेच एकाच ठिकाणी विविध खाद्य पदार्थांची चव घेण्याची संधी मिळावी या उद्देशाने आयोजन करण्यात आले. इयत्ता चौथी ते वर्ग नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध स्टॉल्स लावले होते. ज्यामध्ये खाद्य पदार्थांसोबत गेम्स स्टॉलचे सुद्धा होते. गेम्स अंतर्गत वर्ली लकी ड्रॉ, कप गेम, स्टँड द बॉटल, जॅक ऑफ लॅडर, कॉइन इन वॉटर , कॅच द स्टिक इत्यादीचा समावेश होता. एकुण ३५ स्टॉल्स लावण्यात आले होते. खाद्य पदार्थांच्या स्टॉल्समध्ये मोमोज, इडली सांबर, दही वड़ा, दाबेली, फ्रूट सलाद, बेकरी पदार्थ, कटोरी चाट, भेळ, आलू पोंगे, दाल पकवान, खस्ता, कोल्ड कॉफी, ढोकळा, मंचूरियन इत्यादि पदार्थांचा समावेश होता. परीक्षक म्हणून शिक्षिका लता इंगळे आणि वर्षा शिंदे यांनी काम पाहिले. येथे सुंदर स्टेज, सेल्फी कॉर्नर, मिकी माउस आणि कूपनची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. तसेच विद्यार्थ्यांनी मनोरंजनकरीता सुंदर नृत्य आणि गायन सादर करून या आनंदोत्सवास सुंदर बनविले. शेवटी कूपनचे लकी ड्रॉ काढून विजेत्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय स्वरूपात बक्षीस देण्यात आले. या सह दोन उत्तेजनार्थ बक्षीसही ठेवण्यात आले होते. या आनंदोत्सवास यशस्वी करण्यासाठी प्राचार्य कुरियचन सी. पी. आणि उपप्राचार्या श्वेता चोमवाल यांच्या मार्गदर्शनात शिक्षक वर्ग, विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

# कंडक्टरच्या सतर्कतेमुळे बनावट दिव्यांग प्रवासी पकडला

प्रतिनिधी २५ जानेवारी

**अकोला :** नागपूरहून छत्रपती संभाजीनगरला जाणाऱ्या बसमध्ये एक धडधाकट प्रवासी अमरावतीतून बसला होता. त्याने स्वतःला दिव्यांग असल्याचे सांगून कंडक्टरला एक बनावट प्रमाणपत्र दाखवले आणि सवलतीचे तिकीटही मिळवले. मात्र, कंडक्टरला त्याच्यावर संशय आल्याने त्यांनी प्रमाणपत्राची बारकाईने तपासणी केली असता, ते प्रमाणपत्र बनावट असल्याचे उघड झाले. बस अकोला बसस्थानकावर पोहोचल्यावर कंडक्टरने त्या प्रवाशाला खाली उतरण्यास सांगितले. मात्र, त्या प्रवाशाने उलट कंडक्टरशीच वाद घालण्यास सुरुवात केली. कंडक्टरने तातडीने बसस्थानकावरील पोलीस चौकीत जाऊन तक्रार दिली. यादरम्यान तो प्रवासी त्या बसमधून उतरून दुसऱ्या बसमध्ये जाऊन बसला होता. पोलिसांनी शिताफीने शोध घेऊन त्या बनावट दिव्यांग प्रवाशाला शोधून काढले आणि ताब्यात घेतले. पोलिस याप्रकरणी तपास करत आहेत.






























हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK